अतारांकित प्रश्नोत्तरांची त्रेसष्टावी यादी

# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०२१

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**लातूर जिल्हयात आधारभूत किंमती खरेदी केंद्र तात्काळ सुरु करण्याबाबत**

**(१) ७५६ (०५-०४-२०२०). श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

**(१)** लातूर जिल्हयातील कोरडा दुष्काळ व अतिवृष्टीमुळे शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला असून या नुकसानीचे तातडीने पंचनामे करुन त्यांना आर्थिक मदत देण्यात यावी तसेच आधारभूत किंमत खरेदी केंद्र तात्काळ सुरु करुन एफएक्यू प्रतिच्या मालाची अट रद्द करुन सरसकट शेतमाल खरेदी करावा अशी मागणी लातूर जिल्हयातील शेतकरी आणि काही सामाजिक संघटनांनी मा. जिल्हाधिकारी यांच्याकडे माहे नोव्हेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निवेदन दिले आहे हे खरे आहे काय,

**(२)**. असल्यास, शासनाने वरील प्रकरणाची चौकशी केली आहे काय, त्यानुसार लातूर जिल्हयात आतापर्यंत तालुकानिहाय किती शेतकऱ्यांना एकूण किती रुपयांची नुकसान भरपाई दिली आहे वा देण्यात येणार आहे,

**(३)** तसेच लातूर जिल्हयात आधारभूत किंमती खरेदी केंद्र तात्काळ सुरु करुन एफएक्यू प्रतिच्या मालाची अट रद्द करुन सरसकट शेतमाल खरेदी करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यांत येत आहे

**(४)** नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विजय वडेट्टीवार (२०-०७-२०२१)** (१) आधारभूत किंमत खरेदी केंद्र तात्काळ सुरु करून एफएक्यू प्रतिच्या मालाची अट रद्द करून सरसकट शेतमाल खरेदी करावी अशी मागणी लातूर जिल्हयातील शेतकरी आणि काही सामाजिक संघटनांनी मा.जिल्हाधिकारी यांच्याकडे केल्याबाबतचे निवेदन दिसून येत नाही.

(२) खरीप २०१८ दुष्काळाच्या अनुषंगाने लातूर जिल्हयातील शिरूर अनंतपाळ तालुक्यातील एकुण १२२१७ पात्र लाभार्थ्यांना एकूण रू.४४४.०८ लक्ष निधीचे वाटप करण्यात आले आहे. तसेच लातूर जिल्हयात माहे ऑक्टोबर-नोव्हेंबर, २०१९ मध्ये क्यार व महाचक्रीवादळामुळे झालेल्या अवेळी पावसामुळे शेतीपिकांच्या नुकसानीच्या अनुषंगाने एकूण ४५६६५७ बाधित शेतकऱ्यांना वाटप करण्यासाठी एकूण ३९५५२.८० लक्ष निधी जिल्हाधिकारी, लातूर यांना वितरीत करण्यात आला. त्यापैकी रू.३८७०६.७७ लक्ष निधी ४५६६५७ बाधित शेतकऱ्यांना वाटप करण्यात आला असून उर्वरित निधी समर्पित करण्यात आला आहे.

(३) लातूर जिल्ह्यात एफएक्यू प्रतिच्या मालाची अट रद्द करून सरसकट शेतमाल खरेदी न करता ना नाफेडच्या मापदंडाप्रमाणे २०१९-२० या खरीप हंगामात मुग, उडीद व सोयाबीन या शेतमालाच्या खरेदीकरिता ऑनलाईन नोंदणी करण्यात आली. सोयाबीन व उडीद या शेतमालाची नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांनी खरेदी केंद्रावर विक्री करिता शेतमाल आणला नाही. तथापि, खरीप हंगामात मुग शेतमालाची नोंदणी केलेल्या १९२८ शेतकऱ्यांपैकी १६२ शेतकऱ्यांच्या ३२८.६० क्विंटल माल खरेदी करण्यात आला. तसेच ऑनलाईन नोंदणी केलेल्या २१.८२१ शेतकऱ्यांपैकी ६७८ शेतकऱ्यांची ६७९३ क्विंटल तूर खरेदी करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उदभवत नाही.

**जिंतूर व सेलु (जि.परभणी) या दोन तालुक्यांत ट्रान्सफार्मर जळण्याचे प्रमाण वाढत असल्याबाबत**

**(२) ८९७ (१४-०४-२०२०). श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्ह्यात जिंतूर-सेलु तालुक्यांतील (जि.परभणी) करपरा, कसुरा, दुधना व पूर्णा या नद्या असून व येलदरी सिद्धेश्वर धरण १०० टक्के भरल्याने यावर्षी पाणीसाठा मोठ्या प्रमाणात उपलब्ध असूनही वीज पुरवठा व्यवस्थितरित्या होत नसल्यामुळे शेतक-यांना मुबलक प्रमाणात शेतीकरीता पाणी उपलब्ध होत नसल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कमी दाबाचा वीजपुरवठा व लोडशेडींगमुळे शेतक-यांना कृषीपंपासह अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, जिंतूर व सेलु (जि.परभणी) या दोन तालुक्यांत १०० केव्हीएच्या ट्रान्सफार्मरवर जास्त जोडण्या असल्यामुळे जास्त भार येऊन ट्रान्सफार्मर जळण्याचे प्रमाण वाढले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सद्य:स्थितीत रब्बी पिकांचे नुकसान होत असल्यामुळे वीजेचे ट्रान्सफार्मर वाढविण्यासंबंधीची मागणी सातत्याने जनतेतून होत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, जनहिताच्या दृष्टीकोनातून १०० केव्हीएचे अतिरिक्त ट्रान्सफार्मर या दोन्ही तालुक्यांना देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत.?

**डॉ. नितिन राऊत (१९-०७-२०२१) :** (१) व (२) परभणी जिल्ह्यातील जिंतूर व सेलू तालुक्यामध्ये जास्तीचा पाऊस झाल्यामुळे सर्व वैध तसेच काही अवैध शेतीपंप चालू असल्यामुळे ११ के.व्ही. वाहिनी अतिभारीत होऊन वीज पुरवठा कमी दाबाने होत होता. अवैध शेतीपंप डिसेंबर, २०१९ व जानेवारी, २०२० मध्ये काढून टाकण्यात आले आहे. पाण्याचे योग्य नियोजन करण्यासाठी तसेच कृषी पंपांसाठी आवश्यक असलेला विद्युत पुरवठा लक्षात घेऊन महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या निर्देशानुसार राज्यातील कृषी वाहिन्यांवरील कृषी ग्राहकांना रात्रीच्या काळात १० तास किंवा दिवसा ८ तास वीजेची उपलब्धता चक्राकार पध्दतीने देण्यात येत आहे.

(३) हे खरे आहे. जिंतूर व सेलू तालुक्यामध्ये सन २०१० ते २०१४ या वर्षांमध्ये महावितरण आपल्या दारी या योजनेअंतर्गत एकूण २४२१ ग्राहकांना अस्तित्वात असलेल्या वितरण रोहित्रावरुन केबलवर कनेक्शन देण्यात आलेले आहेत. त्यामुळे अस्तित्वात असलेली १०० के.व्ही.ए रोहित्रे काही अंशी अतिभारीत होऊन जळण्याचे प्रमाण वाढले होते.

(४) व (५) सन २०१९-२० व सन २०२०-२१ मधील माहे एप्रिल, २०२० पूर्वीचे जळालेली रोहित्रे बदलून देण्यात आली आहेत. तसेच महावितरणकडून परभणी जिल्ह्यासाठी वाटप करण्यात आलेल्या १०० के.व्ही.ए क्षमतेचे एकूण १२४ वितरण रोहित्रापैकी ६२ अतिरिक्त रोहित्रे परभणी विभाग क्र.२ ला वर्ग करण्यात आलेले आहेत. तसेच सद्यस्थितीत शेतीपंपासाठीच्या उच्चदाब वितरण प्रणाली (HVDS) योजनेअंतर्गत जिंतूर तालुक्यात ६६२ व सेलू तालुक्यात १८४ असे एकूण ८४६ रोहित्रे बसविण्यात आलेले आहेत. उर्वरित ५६७ रोहित्राची कामे प्रगतीपथावर आहेत.

---

**भंडारा जिल्ह्यातील रुग्णालयांमध्ये रक्ताची व औषधाची उपलब्धता होण्याबाबत**

**(३) २१८७ (१३-०४-२०२०). श्री.राजू कारेमोरे (तुमसर), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) भंडारा जिल्ह्यातील शासकीय जिल्हा सामान्य रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय, ग्रामीण रुग्णालय व प्राथमिक आरोग्य केंद्रावरील रक्तपेढीमधून वेळेवर रक्त पुरवठा होत नसून औषधांचाही मोठ्या प्रमाणात तुटवडा असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्रामीण भागातील गोरगरीब जनतेला खाजगी रक्तपेढीतून अधिक रक्कम मोजून रक्त आणावे लागते आणि खाजगी मेडीकलमधून औषधे खरेदी करावी लागतात, जी त्या रुग्णाला परवडण्यासारखी नसतात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बहुतेक वेळा शासकीय रुग्णालयात रक्त उपलब्ध न झाल्यामुळे शस्त्रक्रिया सुद्धा पुढे ढकलावी लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, भंडारा जिल्ह्यातील संपुर्ण शासकीय रुग्णालयांमध्ये रक्ताची व औषधांची उपलब्धता होण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राजेश टोपे (२८-०७-२०२१) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) जिल्हा सामान्य रुग्णालय, भंडारा व अधिनस्त उपजिल्हा रुग्णालय व ग्रामीण रुग्णालयात औषधांचा व रक्ताचा पुरेसा साठा उपलब्ध आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या अधिग्रहीत जमिनीवर अतिक्रमण सुरु असल्याबाबत

(४) **२८४५ (१५-०४-२०२०). श्री.मदन येरावार (यवतमाळ) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(**१**) यवतमाळ शहरालगत निळोणा धरणाच्या परतीच्या पाण्याच्या साठयाकरीता (बॅक वाटर) शासनाने अधिग्रहीत केलेल्या शेकडो एकर जमिनीवर शेती करण्यासाठी प्रधिकरणाच्या कर्मचा-यांच्या नातेवाईकांनी गत दोन वर्षापासुन अतिक्रमण केले आहे, हे खरे आहे काय,

(**२**) असल्यास, सदर जमिनीवर विषारी किटकनाशक, तणनाशक, फवारणी केल्याने विषारी औषधे निळोणा धरणाच्या पाण्यात मिसळत असल्याने तेच पाणी यवतमाळ शहरातील रहिवाश्यांना प्यावे लागते त्यामुळे शहरातील नागरिकांच्या आरोग्याबाबत प्रश्न चिन्ह निर्माण होत असून जिल्हा परिषद कार्यकारी अभियंता व पोलीस अधिका-यांकडे स्थानिक नागरीकांनी लेखी तक्रार करुन अद्याप पर्यंत कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(**३**) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषींवर कारवाई करण्याबाबत काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गुलाबराव पाटील (०५-०८-२०२१) :** (१) अंशत: खरे आहे. निळोणा धरणाकरीता अधिग्रहीत केलेल्या जागेवर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांच्या नातेवाईकांकडून कोणत्याही प्रकारची वृक्षतोड अथवा अतिक्रमण करण्यात आलेले नाही. मात्र काही स्थानिक लोकांनी ८-१० वर्षापासून सदर जागेवर शेती करण्यास सुरुवात केलेली आहे.

(२) निळोणा धरणाची मालकी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे असून सदर धरणाच्या पाण्यामुळे यवतमाळ शहरातील नागरिकांच्या आरोग्याबाबत प्रश्न चिन्ह निर्माण होत असल्याबाबतची कोणतीही तक्रार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे प्राप्त झालेली नाही. तसेच कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, यवतमाळ, जिल्हा आरोग्य अधिकारी, यवतमाळ व पोलीस अधिकाऱ्यांकडेही या संबंधी कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.

यवतमाळ शहरी पाणी पुरवठा योजनेअंतर्गत शहरातील विविध भागातून पाण्याचे नमुने गोळा करून विषारी किटकनाशके, तणनाशक, विषारी औषधे इ.बाबत राष्ट्रीय पर्यावरण अभियांत्रिकी अनुसंधान संस्थान, नागपूर मार्फत चाचणी करण्यात आली. सदर तपासणी अहवालात वरील बाबी आढळून आल्या नाहीत. तसेच जिल्हा आरोग्य प्रयोग शाळा, यवतमाळ यांच्या सुक्ष्मजीव व रासायनिक अहवालाप्रमाणे सदर पाणी पिण्यास योग्य आहे

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## खडकवासला (ता.हवेली, जि.पुणे) येथे होणाऱ्या वीज चोरी बाबत

**(५) ३१२९ (०२-०६-२०२०). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खडकवासला (ता.हवेली, जि.पुणे) विधानसभा कार्यक्षेत्रात वीज चोरीमध्ये प्रचंड वाढ झाली असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) धायरी व नऱ्हे, सिंहगड रोड, वारजे, किरकिटवाडी या भागात मोठ्या लोकवस्तीच्या ठिकाणी बांधकाम प्रकल्पांना नियमानुसार विकासकाकडून जागा ताब्यात घेऊन त्या ठिकाणी आवश्यकतेनुसार कार्यवाही करून वीज पुरवठा करण्याचा नियम असतांना ट्रान्सफार्मरच्या क्षमतेपेक्षा अधिक वीज भार दिला जात असल्याचे ही निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(३) वीज चोरी मध्ये संबंधित महावितरण विभागाचे अधिकारी वीज चोर माफियांशी संगनमत करून सहकार्य करत असतांना या भागामध्ये सन २०१४ ते सन २०१९ दरम्यान नविन वीजजोड दिलेल्या बांधकाम प्रकल्पाबाबत शासनाने चौकशी केली आहे काय चौकशी नुसार काय आढळून आले, त्यानुसार काय कारवाई करण्यात आली आहे.

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. नितिन राऊत (१९-०७-२०२१) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही. या भागामध्ये महावितरण कंपनीच्या नियमानुसार बांधकाम प्रकल्पांना त्यांच्या मागणीनुसार वीज पुरवठा देत असताना वितरण रोहित्राची (ट्रान्सफॉर्मर) सध्याची वीज भार क्षमता व नवीन येणारा वीज भार या बाबी तपासून घेतल्या जातात. त्या सर्वेक्षणानुसार नवीन बांधकाम प्रकल्पांना सद्यस्थितीतील जुन्या वितरण रोहित्रांवर किंवा आवश्यकता असल्यास विकासकांकडून नियमानुसार जागा ताब्यात घेऊन नवीन वितरण रोहित्र प्रस्तावित करुन वीज पुरवठा देण्यात येतो.

(३) सन २०१४ ते २०१९ दरम्यान महावितरण विभागाकडून नवीन बांधकाम प्रकल्पांना महावितरण कंपनीच्या नियमानुसार वीज पुरवठा करण्यात आला आहे. सदर बाबतीत या कालावधीत महावितरण कंपनीकडून कोणतीही अनियमितता घडलेली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात वयोवृध्दांना सामाजिक व आर्थीक परिस्थिती अनकुल नसल्याबाबत

**(६) ३४०४ (२७-०७-२०२०). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वृध्दांच्या समस्या आणि निराकरणासाठी काम करणाऱ्या एका हेल्पलाईन संस्थेने केलेल्या संशोधनात, जेष्ठ आणि वयोवृध्दांना सामाजिक व आर्थीक परिस्थिती अनकुल नसुन वृध्दांचा आदर केला जात नाही, त्याचबरोबर समाजात सर्वच स्तरांवर त्यांची अवहेलना केली जात असल्याची बाब संशोधनाव्दारे माहे डिसेंबर २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वयोवृध्दांच्या बाबतीत गंभीर गुन्हा घडतो तेंव्हाच पोलीसांना शहरात एकटया राहत असलेल्या वयोवृध्द नागरिकांच्या सुरक्षेची आठवण होत असल्याचे केलेल्या संशोधनात स्पष्ट करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास चौकशीत काय आढळून आले वा त्यानुसार वयोवृध्दांच्या सुरक्षिततेसाठी तसेच त्यांच्या कल्याणासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. धनंजय मुंडे (१३-०७-२०२१) :** (१) नाही.
(२) नाही
(३) प्रश्न उद्‌भवत नाही
(४) प्रश्न उद्‌भवत नाही,

तथापि ज्येष्ठ नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी त्यांच्या अडचणीच्या काळात तातडीने पोलीस दलाशी संपर्क साधता यावा याकरीता १०० नंबर उपलब्ध करणेत आला आहे. तसेच आधुनिक यंत्रणाव्दारे संपर्क करण्यात येत आहे.पोलीस ठाणेच्या कार्यक्षेत्रात वास्तव्यास असणा-या ज्येष्ठ नागरीकांची विशेषत एकाकी राहणाऱ्या ज्येष्ठ नागरीकांची यादी अद्यावत करण्यात आलेली असुन अश्या ज्येष्ठ नागरीकांची पोलीस ठाणे स्तरावरील अधिकारी/अंमलदार वेळोवेळी भेट घेत असुन त्यांच्या अडचणी/तक्रारींचे निवारण करतात.
(५) प्रश्नच उदभ्वत नाही.

---

**राज्यात रिक्षा टॅक्सी इ.वाहनामधून विनापरवाना होत असलेली विदयार्थ्यांची वाहतूक**

**(७) ४१३२ (०९-०४-२०२०). श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.वैभव नाईक (कुडाळ), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), डॉ.तानाजी सावंत (परांडा)** :सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात, केंद्रीय कायदयाचे उल्लंघन करुन, रिक्षा, व्हॅन, टॅक्सी आदी वाहनांमधून विना परवाना विद्यार्थ्यांची वाहतूक सुमारे १,५०२ वाहनांवर पोलिसांनी कारवाई ४१ लाख ६६ हजार रुपयाचा दंड दिनाक १७.डिसेंबर २०१९ रोजी वा त्यासूमारास वसूल केल्याची बाब निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) तसेच राज्यात ४० हजार बेकायदेशीर स्कूल व्हॅन मधून विद्यार्थ्यांची वाहतूक होत असल्याचे सचोल बस ओनर्स असोसिएशन ने माहे डिसेंबर २०१९ मध्ये शासनाच्या निदर्शनास आणून दिले असल्याने राज्य परिवहन विभागाने अनधिकृत स्कूल व्हॅन आणि बसगाडयांची तपासणी करुन दिनांक.१५ जानेवारी, २०२० रोजीपर्यंत अहवाल पाठविण्याचे आदेश परिवहन आयुक्तांनी दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रमाणे कारवाईसाठी नियुक्त करण्यात आलेल्या ५० अधिकाऱ्यांनी ५ दिवसात केवळ ३० गाड्यांवर कारवाई केली असल्याने बेकायदेशीर स्कूल व्हॅन ची संख्या ४० हजार पेक्षा अधिक झाली असल्याने शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षेबाबत शासनाचे दुर्लक्ष होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार अशा बेकायदेशीर वाहतूकीस आळा घालण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच याबाबतची सद्यःस्थिती काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब (२२-०७-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

पोलिस (वाहतूक) विभागाकडून प्राप्त माहितीनुसार सन-२०१९ मध्ये राज्यात केंद्रीय कायद्याचे उल्लंघन करून रिक्षा, व्हॅन, टॅक्सी आदी वाहनांमधून विना परवाना विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या वाहन चालकांवर वाहतूक (पोलिस) विभागाकडून करण्यात आलेल्या कारवाईत ३५१५ केसेस करण्यात आलेल्या असून रू.१२,७९,२००/- इतका दंड वसूल करण्यात आलेला आहे.

(२) होय, हे खरे आहे. परिवहन आयुक्त कार्यालयाच्या दि.०६.०१.२०२० च्या कार्यालयीन आदेशाद्वारे अशा प्रकारची तपासणी करण्याचे आदेश जारी करण्यात आलेले आहेत.

(३) हे खरे नाही. सदर मोहीमेमध्ये राज्यात ३४३ स्कुल बस व विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या ३०९ अन्य वाहनांविरुद्ध कारवाई करण्यात आलेली आहे. या दरम्यान ९९ वाहने जप्त करण्यात आली असून रु.१०,२७,५००/- इतका दंड वसूल करण्यात आलेला आहे.

(४) अनधिकृत स्कुल व्हॅन व बस गाड्यांविरुद्ध वायुवेग पथकांमार्फत नियमितपणे कारवाई करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात तंबाखू नियंत्रण अभियान अधिक सक्षम करण्याबाबत.**

**(८) ४४०० (२४-०७-२०२०). श्री.विक्रमसिंह सावंत (जत) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय आरोग्य अभियान या योजनेच्या माहितीनुसार राज्यात २६ टक्के नागरिकांना तंबाखूचे व्यसन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे राज्यात कर्करोगाचे प्रमाण वाढले असून दरवर्षी हजारो व्यक्तींचा मृत्यू होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने तंबाखू नियंत्रण अभियान अधिक सक्षम करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राजेश टोपे (२८-०७-२०२१) :** (१) होय हे खरे आहे.

भारत सरकार आणि जागतिक आरोग्य संघटनेने केलेल्या सर्वेक्षणानुसार राज्यात २६.६ टक्के व्यक्ती तंबाखुचे सेवन करतात.

(२) हे खरे आहे,

जागतिक आरोग्य संघटना, २०१८ च्या अहवालानुसार देशात तंबाखु सेवन करणा-या व्यक्तीपैकी १० टक्के व्यक्तींचा कर्करोगाने मृत्यु होतो.

(३) सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रम ३४ जिल्ह्यांमध्ये राबविण्यात येत आहे.

• Cigarette and other Tobacco Products Act २००३ (COTPA Act २००३) ची अंमलबजावणी करण्यासाठी राज्यस्तरावर मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय समन्वय समितीची स्थापना करण्यात आलेली आहे.

• जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समन्वय समिती स्थापना करण्यात आली आहे. Cigarette and other Tobacco Products Act २००३ (COTPA Act २००३) कायद्यांतर्गत विविध कलमातील तरतुदीनुसार कारवाई करुन दंड वसूल करण्यात येतो.

• राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रमांतर्गत शैक्षणिक संस्था तसेच शासकीय संस्था तंबाखू मुक्त करण्यासाठी अभियान राबविण्यात येत आहे.

• साथरोग अधिनियम १८९७ व आपत्ती व्यवस्थापन कायदा, २००५ मधील तरतूदींच्या अधिन राहून राज्यात कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी तंबाखू,सुपारी,पान,पानमसाला,गुटखा तसेच इतर तंबाखूजन्य पदार्थांच्या सेवनास/थुंकण्यास व धुम्रपानास (ई-सिगारेटसह) शासन निर्णय दिनांक २९.०५.२०२० अन्वये प्रतिबंध करण्यात आलेला आहे.

• राज्यात सुट्या स्वरूपात (loose pocket) बिडी वा सिगारेट विक्री करण्यास दिनांक २४.०९.२०२० अन्वये बंदी घालण्यात आलेली आहे.

• तंबाखु व तंबाखूजन्य पदार्थांच्या सेवनामुळे आरोग्यावर होणाऱ्या दुष्परिणामांबद्दल विशेषत: तरूण मुले आणि अशिक्षित लोकांमध्ये विशिष्ट आरोग्य चेतावणीचा इशाराबाबत जागरुकता आणण्याकरिता शासन निर्णय दिनांक ३.०५.२०२१ अन्वये सूचना केलेल्या आहेत.

• जनजागृतीसाठी विविध प्रमारचे उपक्रम चालू आहेत.

उदा.१)जागतिक तंबाखू विरोधी दिन ३१ मे, २)दुरदर्शन वरील कार्यक्रम, ३) रेडियो जिंन्गल,४) स्ट्रीट प्ले, ५)शैक्षणिक संस्थामध्ये प्रभात फेरी, वत्कृत्व स्पर्धा, रांगोळी स्पर्धा,६) मुखरोग तपासणी इ.

• राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी होण्याकरीता राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रमांतर्गत कार्यरत अधिकारी यांचे जिल्हास्तर व राज्यस्तरावर प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित केल्या जातात.

• सदर कार्यक्रमांतर्गत गृहविभाग, शिक्षण विभाग, सामाजिक संस्था, आरोग्य विभागात काम करणारे अधिकारी व कर्मचारी यांचे राज्यस्तर व जिल्हास्तरावर प्रशिक्षण घेतले जातात.

• अवैध तंबाखू तथा तंबाखूजन्य पदार्थांची विक्री करणा-यांवर Cigarette and Other Tobacco Products Act २००३ (COTPA Act २००३) या कायद्यांतर्गत कारवाई करुन त्यांना तंबाखूच्या दुष्परिणामाची जाणीव करुन दुसरा व्यवसाय करण्यासाठी मार्गदर्शन केले जाते. तसेच त्यांचेवर दंडात्मक कारवाई सुध्दा केली जाते.

• कर्करोगाचे वेळेत निदान व उपचार होण्यासाठी कर्करोगाचे तपासणी शिबीरे घेण्यात येतात.

• प्रत्येक जिल्हारुग्णालय, उपजिल्हा रुग्णालयात व प्राथमिक आरोग्य केंद्र इत्यादी ठिकाणी तंबाखू मूक्तीबाबत मार्गदर्शन व समुपदेशन केले जाते.
• राज्यातील सर्व शैक्षणिक संस्था टप्याटप्याने तंबाखूजन्य करण्याच्या दृष्टीने सन २०२०-२१ पासून राज्यभरात Yellow Line Campaign राबविण्यात येत आहे.
• सद्यस्थितीमध्ये माहे मार्च २०२१ पर्यंत २०३२ इतक्या शैक्षणिक संस्थांमध्ये Yellow Line Campaign राबविण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर शहरातील विद्युत वितरण चे लेखापरिक्षण करण्याचे दिलेले आदेश**

**(९) ५३४३ (०२-०४-२०२०). श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरातील गांधीबाग, महाल व सिव्हील लाईन या तीन विभागातील विद्युत वितरण फ्रेंचाईजी एस.एन.डी.एल. यांनी महावितरणला सोपविण्यात आलेल्या कार्यभारातील हिशोबामध्ये रु. २२४.०० कोटीची तफावत येत असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तत्कालीन मंत्री महोदयांनी तातडीने लेखा परिक्षण करण्याचे आदेश दिले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत (१९-०७-२०२१) :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील महत्वाच्या नद्यांच्या संवर्धनाबाबत**

**(१०) ५५१६ (१६-०४-२०२०). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे जिल्हयातील उल्हास नदीसह मुंबईतील मिठी, नागपूर येथील नदीसह राज्यातील २१ महत्वाच्या नद्यांच्या संवर्धनासाठी ३० हजार कोटी रुपयांचा प्रस्ताव केंद्र शासनाकडे मंजूरीकरिता सादर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावाला केंद्र शासनाने मंजूरी दिली आहे काय,
(३) नसल्यास, शासनाने याबाबत काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. आदित्य ठाकरे (३०-०७-२०२१) :** (१) राज्यातील नद्यांच्या संवर्धनासाठी दि.२८ जून २०१९ रोजीच्या पत्रान्वये निती आयोगास प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.
(२) नाही.
(३) व ४) दि.०६.११.२०२० च्या पत्रान्वये निती आयोगाकडे पाठपूरावा करण्यात आलेला आहे.

---

**बीड जिल्हा रुग्णालयात सलाइनच्या बाटलीत शेवाळ आढळल्याबाबत**

**(११) ५६५४ (२५-०३-२०२०). श्रीमती सीमा महेश हिरे (सीमाताई) (नाशिक पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), डॉ.तुषार राठोड (मुखेड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बीड जिल्हा रुग्णालयात सलाईनच्या बाटलीत शरीरासाठी घातक असलेले शेवाळ आढळुन आल्याचे माहे जानेवारी २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, औषध पुरवठा करणा-या कंपनीकडून पूर्णत: निर्जंतुकीकरण करुन औषधांचा पुरवठा करणे आवश्यक असतानाही विना निर्जंतुकीकरण केलेली औषधे पुरवली जात असुन यात मोठा गैरव्यवहार झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास उपरोक्त प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तसेच दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलबाची कारणे काय आहेत?

**श्री. राजेश टोपे (२३-०७-२०२१) :** (१) बीड जिल्हा रुग्णालयात दि.२८.१.२०२० रोजी एक रिंगर लॅक्टेड च्या बाटलीमध्ये शेवाळ असल्याचे जिल्हा शल्य् चिकित्सक यांच्या निदर्शनास आले आहे.
(२) मे. डेनिस केम लॅब या औषध पुरवठादार कंपनीला हाफकिन महामंडळ (खरेदी कक्ष), मुंबई यांनी दि.२०.०३.२०१८ रोजी ४९,८०,९०० रिंगर लॅक्टेड या बाटल्यांच्या पुरवठयाचे आदेश राज्यातील ३४ जिल्हा परिषदांना व ३४ जिल्हा शल्य् चिकित्सक यांना देण्यात आले होते. सर्व राज्यात निर्जंतुक औषधांच्या एकुण बॅचेस पुरवठा झाला असून गैरव्यवहार झाला हे खरे नाही.
(३) व (४) होय
१) सदर बॅचचा वापर थांबविण्यात आला आहे.
२) या बॅचेचे नमुने पुढील तपासणी करीता सहाय्य्क आयुक्त अन्न व प्रशासन बीड यांना पाठविण्यात आले आहेत.

---

**आरोग्य विभागाकडून सुरू करण्यात आलेल्या १०८ क्रमांकाच्या रुग्णवाहिकेच्या संदर्भात धोरणात्मक निर्णय घेणेबाबत**

**(१२) ५८८३ (२५-०३-२०२०). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.प्रताप अडसड (धामणगाव रेल्वे), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) 'गोल्डन अवर'मध्ये रुग्णाला तातडीने प्राथमिक उपचार मिळावे, तसेच प्रसूतीसाठी अडलेल्या ग्रामीण भागातील महिलांना तातडीने वैद्यकीय मदत मिळावी, यासाठी आरोग्य विभागाकडून सुरू करण्यात आलेल्या १०८ क्रमांकाच्या रुग्णवाहिकेच्या संदर्भात राज्याच्या अनेक भागांतून मोठ्या प्रमाणावर तक्रारी येत असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू तक्रारींची दखल घेऊन राज्य शासनाने विशेष समिती गठीत करून या संदर्भातील अहवाल शासनास सादर केला आहे काय,

(३) तसेच रुग्णवाहिकांची देणी व डॉक्टरांचे वेतनही थकित असल्याच्या अनेक तक्रारी शासनाकडे प्राप्त झाल्या आहेत हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार रुग्णवाहिकांची देणी व डॉक्टरांचे वेतन अदा करण्याबाबत तसेच १०८ क्रमांकाच्या रुग्णवाहिकांसंदर्भात धोरणात्मक निर्णय घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत?

**श्री. राजेश टोपे (२३-०७-२०२१) :** (१) हे अंशत: खरे आहे.प्राप्त झालेल्या तक्रारींपैकी बहुतांश तक्रारी या रुग्णवाहिका लवकर न पोहचल्याबाबतच्या आहेत.तथापि, रुग्णवाहिका पोहचल्यावर रुग्णांनी त्यांच्या समस्यांचे निराकरण झाल्याचे कळविले आहे.

(२) प्रश्न उदभवत नाही.

(३) रुग्णवाहिकांचे देय बिले शक्यतो वेळेवर पारित केले जातात. त्याचप्रमाणे डॉक्टरांचे वेतन हे सेवा पुरवठादारामार्फत वेळेवर दिले जाते, असा अहवाल प्राप्त झाला आहे.

(४) प्रश्न उदभवत नाही.

(५) प्रश्न उदभवत नाही.

---

**धुळे तालुक्यात कृषी पंपाचे ट्रान्सफार्मर नादुरुस्त असल्याबाबत**

**(१३) ६७२६ (०२-०४-२०२०). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे तालुक्यात कृषी पंपाचे ट्रान्सफार्मर नादुरुस्त झाले असून त्याचा परिणाम शेतकऱ्यांच्या उत्पादनावर होत असल्याचे माहे फेब्रुवारी,२०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय ?

(२) असल्यास, सदर ट्रान्सफार्मर बदलून नवीन ट्रान्सफार्मर उपलब्ध करुन देण्यास शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत (१९-०७-२०२१) :** (१) धुळे मंडळ कार्यक्षेत्रात अधिक पावसाच्या परिणामी एप्रिल, २०१९ ते फेब्रुवारी, २०२० या कालावधीत १८१४ रोहित्रे नादुरुस्त झाल्याची नोंद आहे.
(२) एप्रिल, २०१९ ते ऑगस्ट, २०२० पर्यंत धुळे तालुक्यात शेतीपंपाचे ४३२ रोहित्रे नादुरुस्त झाले असून त्यापैकी ४२४ रोहित्रे दिनांक ३१.०८.२०२० पर्यंत बदलविण्यात आले आहेत. धुळे तालुक्यातील नादुरुस्त रोहित्रे दुरुस्तीचे काम करण्यासाठी ११ ठेकेदारांना कामाचे आदेश देण्यात आले असून रोहित्रे तात्काळ दुरुस्त करुन बदलविण्यात येत आहे.

एप्रिल, २०२० ते ऑगस्ट, २०२० पर्यंत धुळे तालुक्यात एकूण १६८ रोहित्रे नादुरुस्त झालेले असून त्यातील १६० रोहित्रे दिनांक ३१.०८.२०२० पर्यंत बदलविण्यात आलेले आहेत. तसेच बाकी नादुरुस्त ८ रोहित्रे दिनांक ०९.०९.२०२० पर्यंत बदलविण्यात आले आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सिंधुदुर्ग व रत्नागिरी जिल्ह्यात खरेदी विक्री संघाच्या माध्यमातून काजू बी खरेदी व एकाधिकार खरेदी योजना सुरू करण्याबाबत

**(१४) ९१८४ (२९-०५-२०२०). श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) :** सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोरोनामुळे राज्यात लॉकडाऊन सुरू असल्याने कोकणातील विशेषत: सिंधुदुर्ग व रत्नागिरी या जिल्ह्यांमधील हजारो काजू बागायतदारांचा कोट्यवधी रुपये किंमतीचे काजू बी खरेदीविना पडून आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील लॉकडाऊन मुळे कोकणातील काजू बी ला भाव मिळत नसल्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास , राज्यात सन १९७७ मध्ये काजू बी साठी एकाधिकार खरेदी योजना सुरू करण्यात आली आहे , हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सिंधुदुर्ग व रत्नागिरी या जिल्ह्यांतील खरेदी विक्री संघाच्या माध्यमातून काजू बी खरेदी करण्यासह काजू बी साठी एकाधिकार खरेदी योजना सुरू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे (२९-०७-२०२१) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.
(२) लॉकडाऊनमुळे बहुतांशी बाजारपेठा तसेच प्रक्रिया उद्योग पूर्ण क्षमतेने चालू नसल्याने काजू बी खरेदीचा दर कमी झाला. त्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाले आहे. काजू बीच्या खरेदी-विक्रीचे विनियमन कृषी विभागाकडून करण्यात येत नाही.
(३) व (४) खरेदी-विक्री ही बाब पणन विभागाशी संबंधित असल्याने यासंदर्भात त्या विभागाकडे विचारणा करण्यात आली होती. तथापि, काजू बी खरेदी करण्याची कोणतीही योजना पणन विभागामार्फत राबविली जात नाही किंवा राबविण्याचे विचाराधीन नसल्याचे सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाने कळविले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अंजनगाव सुर्जी (जि.अमरावती) येथील ग्रामीण रुग्णालय श्रेणीवर्धीत करण्याबाबत**

**(१५) ९७६९ (२८-०५-२०२०). श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंजनगाव सुर्जी (जि.अमरावती ) शहर जिल्हा मुख्यालयापासून ८० कि.मी. दूर असून ग्रामीण रुग्णालयात मोठ्या संख्येने रुग्ण येत असून सद्यस्थितीत रुग्णालयात ३० खाटांची व्यवस्था असून ती अपुरी पडत असल्याने रुग्णांची गैरसोय होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अंजनगाव सुर्जी येथील ग्रामीण रुग्णालय ३० खाटां ऐवजी ५० खाटांच्या रुग्णालयात श्रेणीवर्धीत करण्याचा प्रस्ताव सहसंचालक आरोग्य सेवा , रुग्णालये (राज्यस्तर ) मुंबई यांच्यामार्फत दिनांक २ फेब्रुवारी २०१९ रोजीच्या पत्रान्वये प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांच्याकडे सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रस्तावास मान्यता देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे (२३-०७-२०२१) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) हे अंशत: खरे आहे.

दि.१३ जुलै २०१८ च्या शासन निर्णयान्वये ग्रामीण रुग्णालय,अंजनगाव सुर्जीचे ५० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयात श्रेणीवर्धन करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उदभवत नाही.

---

**पुणे जिल्हयातील प्राथमिक आरोग्य केंद्र व ग्रामीण रुग्णालयातील पदे रिक्त असल्याबाबत**

**(१६) ११३४४ (०९-०९-२०२०). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.अशोक पवार (शिरुर), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी), श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हयातील प्राथमिक आरोग्य केंद्रातील कर्मचाऱ्यांच्या ३५० विविध पदांच्या रिक्त जागा असल्याने उपलब्ध कर्मचाऱ्यांवर अतिरिक्त कामाचा ताण पडत असून रुग्णांना आरोग्यसेवा देण्यात अडचणी उद्‌भवत आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच, खडकवासला (ता. हवेली, जि.पुणे) येथील ग्रामीण रुग्णालय, प्राथमिक आरोग्य केंद्रात वैद्यकीय अधिकारी, कर्मचाऱ्यासह परिचारिकांची पदे रिक्त असल्याने कोरोनाच्या पार्श्वभूमीवर रुग्णांची गैरसोय होत असल्याचे माहे जून, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोरोना संसर्गाच्या काळात खडकवासला विधानसभा क्षेत्रातील एकूण प्राथमिक आरोग्य केंद्रात पूर्ण वेळ उच्च पदवीधर वैद्यकीय अधिकारी, तसेच कर्मचाऱ्यासह परिचारिकांची पदे रिक्त असल्याने आरोग्य केंद्र वापराविना पडून असून उपकेंद्रांची दुरवस्था झाली असल्याने असुविधांमुळे रुग्णासह नातेवाईकांची देखील गैरसोय होत असून त्याभागातील रुग्णांना दूरच्या अंतरावर जवळपास १० ते १५ किमी प्रवास करावा लागत असून काहींना अतितातडीच्या उपचारासाठी खाजगी रुग्णालयात उपचार घ्यावे लागत असल्याचे ही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(५) असल्यास, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे (२०-०७-२०२१) :** (१) तात्कालीन परिस्थितीत पदे रिक्त होती. हे खरे आहे. तथापि, सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दि.२८.०२.२०२१ रोजीच्या पदभरती परिक्षेद्वारे विविध संवर्गातील रिक्त पदे भरण्यात आली असून उर्वरित रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरू करण्यात आली आहे. तसेच, ग्रामविकास विभागाच्या अधिपत्याखालील आरोग्य सेवेशी निगडित रिक्त पदे भरण्याची कार्यवाही ग्रामविकास विभागामार्फत दि.१४.०६.२०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये करण्यात येत आहे.

तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत १२५ कंत्राटी पदे भरण्यात आली असून ह्या कंत्राटी कर्मचाऱ्यांमार्फत रुग्ण सेवा सुरळीत सुरू आहे.
(२) हे खरे नाही.
खडकवासला येथे ग्रामीण रुग्णालय कार्यरत नाही.तथापि प्राथमिक आरोग्य केंद्र कार्यरत असून तेथील वैद्यकीय अधिकारी व तांत्रिक कर्मचाऱ्यांची सर्व पदे भरलेली आहेत.त्यामुळे रुग्णांची गैरसोय होत नाही.
(३) हे खरे नाही.
या कार्यक्षेत्रातील ४ प्राथमिक आरोग्य केंद्र व त्याअंतर्गत उपकेंद्रातील ८ वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या पदांपैकी ७ पदे भरलेली आहे व तांत्रिक कर्मचाऱ्यांची ५२ पैकी ४३ पदे भरलेली आहेत.त्यामुळे रुग्णांची गैरसोय होत नाही.या चारही प्राथमिक आरोग्य केंद्राना रुग्णवाहिका उपलब्ध आहेत व रुग्ण सेवा देतात.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील पत्रकारांवर दाखल केलेले गुन्हे मागे घेण्याबाबत**

**(१७) ११३९५ (१३-०९-२०२०). श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) एबीपी माझाचे पत्रकार श्री राहुल कुलकर्णी यांनी वाधवान प्रकरणात सरकारने दिलेले पत्र सार्वजनिक केल्याच्या काही दिवसातच वांद्रे स्थानकावर झालेल्या गर्दीचा आरोप त्यांच्यावर लावून त्यांना अटक करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, टाइम्स नाऊ या राष्ट्रीय वृत्तवाहिनीच्या संपादकांना थेट एफआयआर दाखल करण्याची व चौकशी करण्याची धमकी स्वतः राज्याच्या गृहमंत्र्यांनी दिली असून रिपब्लिक टीव्हीचे संपादक श्री.अर्णब गोस्वामी यांना ना. म. जोशी मार्ग पोलीस स्टेशनला चौकशीसाठी साडेबारा तास बसवून ठेवण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच टीव्ही ९ चे पत्रकार श्री .राहुल चौधरी यांनी धुळे येथील स्थलांतरित मजुरांसाठी असलेले शासनाचे रिलिफ कॅम्प केवळ कागदोपत्री असल्याची बातमी दाखविल्याने त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला असून कोरोनासंबधी औरंगाबाद शहरातील वास्तववादी चित्रण असलेले वृत्त प्रकाशित केल्याबद्दल दिव्यमराठी या वृत्तपत्राच्या संपादकावरही गुन्हा दाखल करण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत चौकशी करून या पत्रकारांवर दाखल केलेले गुन्हे मागे घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात आली आहे ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (२०-०७-२०२१) :** (१) नाही.

कोरोना विषाणू प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर टाळेबंदी घोषित असताना विविध ठिकाणी अडकलेल्या मजुरांसाठी विशेष जनसाधारण ट्रेन सुरु होणार असे वृत्त ABP माझाचे पत्रकार श्री.राहुल कुलकर्णी यांनी प्रसिध्द केल्याने वांद्रे रेल्वे स्टेशनच्या पश्चिमेस १००० ते १२०० परप्रांतीय मजूर जमा झाले. त्यामुळे साथीच्या रोगाचा संसर्ग पसरुन जीवीतास धोका होण्याचा संभव असल्याने त्यांचेविरुध्द वांद्रे पोलीस ठाणे येथे गु.र.क्र.२९१/२०२० नुसार गुन्हा नोद करुन त्यांना दिनांक १५.०४.२०२० रोजी अटक करण्यात आली आहे.

(२) नाही. रिपब्लिक भारत टिव्हीचे संपादक श्री.अर्णब रंजन गोस्वामी हे निवेदित करीत असलेल्या “पुछता है भारत” या कार्यक्रमात बदनामीकारक व आक्षेपार्ह वक्तव्य करुन धार्मिक तेढ निर्माण केल्याने त्यांच्याविरुध्द बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या अधिपत्याखालील ना.म.जोशी पोलीस ठाणे, मुंबई येथे गु.र.क्र.१६४/२०२० अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. सदर गुन्ह्याच्या संबंधाने रिपब्लिक टीव्हीचे संपादक श्री.अर्णब गोस्वामी यांना रितसर पूर्व समन्स देऊन त्यांच्याकडे चौकशी करण्यात आली.

(३) टीव्ही ९ वृत्त वाहिनीचे पत्रकार श्री. राहूल झोरी यांनी मजूरांसाठीच्या निवा-याबाबत बदनामीकारक वृत्तांकन केल्यामुळे त्यांच्याविरुध्द शिरपूर पोलीस स्टेशन, ता.शिरपूर, जिल्हा धुळे येथे गु.र.नं.१८९/२०२० नुसार अदखलपात्र गुन्हा नोंदविण्यात आला आहे. तसेच औरंगाबाद येथे दै.दिव्य मराठी वर्तमान पत्रामध्ये चुकीची माहिती प्रसिध्द केल्याबाबत संपादक, प्रकाशक व संबंधित पत्रकार यांच्याविरुध्द गु.र.नं.१७०/२०२० नुसार साथीचे रोग अधिनियमाप्रमाणे पोलीस स्टेशन, बेगमपुरा येथे गुन्हा दाखल करुन सदर गुन्हा अधिक तपासकामी पोलीस स्टेशन, सिटीचौक येथे वर्ग करण्यात आला आहे.

(४) सिटी चौक, पोलीस ठाणे, औरंगाबाद येथे दैनिक दिव्य मराठी या वर्तमानपत्राच्या संपादक, प्रकाशक व संबंधित पत्रकार यांच्यावर दाखल गुन्ह्याच्या तपासाअंती मा.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, औरंगाबाद या न्यायालयात दिनांक २९.०९.२०२० रोजी दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असून “क” फायनल मंजूरीसाठी मा.न्यायालयात प्रलंबित आहे.

श्री. राहूल झोरी, वार्ताहर, टि.व्ही.९, यांनी परप्रांतीय मजुरासाठीच्या निवाऱ्याबाबत भ्रष्टाचार केल्याचे बदनामीकारक वृत्तांकन प्रकरणी शिरपूर पोलीस ठाणे, जि.धुळे येथे अदखलपात्र दाखल गुन्ह्याचा तपास पूर्ण करुन मा.प्रथमवर्ग न्यायालय, शिरपूर यांच्याकडे सीआरपीसी कलम १५५(२) अन्वये परवानगी घेऊन अदखलपात्र गुन्हा ए.सी. फायनल दोषारोपपत्र केले असता, मा.न्यायालयाने सदर गुन्हा भा.दं.वि. कलम ५००, ५०१ अन्वये दाखल केलेला असल्याने दोषारोपपत्र दाखल करता येणार नसल्याचे सांगितले. एन.सी. तपासाची पोलीस स्टेशन स्तरावरची प्रक्रिया पूर्ण झाली आहे.

---

**मुंबईसह राज्यातील सात शहरात सुमारे ८१००० सदनिका तयार स्थितीत पडून असल्याबाबत**

**(१८) ११४९४ (१७-०९-२०२०). श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईसह राज्यातील सात शहरात सुमारे ८१००० सदनिका तयार स्थितीत पडून असल्याचे नुकतेच माहे जून, २०२० मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानूसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास टाळेबंदी दरम्यान ढासळलेल्या अर्थव्यवस्थेला चालना मिळण्यासाठी मुद्रांक शुल्क कमी करण्याबाबत महाराष्ट्र उद्योग व व्यापार महासंघ कमिटीने शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त कमिटीच्या मागणीनुसार शासन स्तरावर कोणता निर्णय घेण्यात आला वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात (२९-०७-२०२१) :** (१), (२), (३) व (४)

नोंदणी व मुद्रांक विभागाच्या अधिनस्त असलेल्या क्षेत्रिय दुय्यम निबंधक कार्यालयांमार्फत स्थावर तथा अचल व चल मालमत्तांच्याबाबतीत दस्तांच्या नोंदणीची कार्यवाही पार पाडली जाते. जोपर्यंत असा दस्त नोंदणीसाठी येत नाही तोपर्यंत सदर मिळकत पडून आहे की कसे? याबाबत भाष्य करणे शक्य होत नाही.

तथापि, महाराष्ट्र राज्याच्या आर्थिक वाढीस आणि गुंतवणूकीच्या ओघास प्रोत्साहन देण्यासाठी रिअल इस्टेट संदर्भात शासनामार्फत नियुक्त करण्यात आलेल्या श्री दिपक पारेख समितीने केलेल्या शिफारशींस अनुलक्षून महाराष्ट्र शासनाने दि.२९ ऑगस्ट, २०२० व दि.२१ डिसेंबर, २०२० रोजीच्या अधिसूचित आदेशांन्वये कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर राज्यातील जनतेला स्थावर मिळकत खरेदी करण्यास दिलासा देण्याच्या अनुषंगाने कोणत्याही स्थावर मिळकतीबाबतच्या अभिहस्तांतरणपत्र किंवा विक्रीकरारपत्राच्या आणि भाडेपट्ट्याच्या दस्तऐवजावर आकारणी योग्य असलेल्या मुद्रांक शुल्कामध्ये सवलत देण्याचा निर्णय घेतला आहे.

त्यानुसार, प्रचलित असलेला मुद्रांक शुल्काचा दर दि.१ सप्टेंबर, २०२० ते ३१ डिसेंबर, २०२० या कालावधीसाठी मुंबई आणि मुंबई उपनगर जिल्ह्यात तीन टक्केने आणि उर्वरित महाराष्ट्र राज्यात दोन टक्केने कमी केला आहे. याशिवाय, उक्त कालावधीत मुद्रांक शुल्क

स्वरुपात वसुल केला जाणारा स्थानिक संस्था अधिभार हा देखिल संपूर्ण राज्यभर माफ करण्यात आला आहे. तर, दि.१ जानेवारी, २०२१ ते ३१ मार्च, २०२१ या कालावधीसाठी मुंबई आणि मुंबई उपनगर जिल्ह्यात उक्त दर दोन टक्केने आणि उर्वरित महाराष्ट्र राज्यात दिड टक्केने मुद्रांक शुल्क कमी करुन मुद्रांक शुल्क स्वरुपात वसुल केला जाणारा स्थानिक संस्था अधिभार संपूर्ण राज्यभर अर्धा टक्केने कमी करण्यात आला होता.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**येलदरी (ता.जिंतूर, जि.परभणी) सावंगी म्हाळसा येथील वीज वितरण कंपनीकडून प्रस्तावित असलेल्या ऊर्जा प्रकल्पाचे काम प्रलंबित असल्याबाबत**

**(१९) ११६४५ (१३-०७-२०२०). श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) येलदरी (ता.जिंतूर, जि.परभणी) परिसरानजीक असलेल्या सावंगी म्हाळसा येथील गायरान जमिनीवर वीज वितरण कंपनीकडून ५ मेगावॅट च्या सौर ऊर्जा प्रकल्पाचे प्रस्तावित काम अनेक दिवसांपासून अपूर्णावस्थेत असल्याचे माहे जून, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय
(२) असल्यास, शेतकऱ्यांना अंदाजे १२ तास वीज उपलब्ध करण्याच्या उद्देशाने सुरू करण्यात आलेल्या प्रकल्पाचे काम अपूर्ण असल्याने शेतकऱ्यांना अडचणी निर्माण होत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर प्रकल्प पूर्ण करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. नितिन राऊत (२२-०७-२०२१) :** (१), (२) व (३) राज्यात "मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना" टप्पा-१ अंतर्गत महानिर्मिती कंपनीने दि. १५.०३.२०१९ रोजी एकूण १८४ मेगावॅट क्षमतेच्या सौर ऊर्जा प्रकल्पांसाठीची निविदेची जाहीरात महानिर्मिती कंपनीच्या संकेतस्थळावर प्रकाशित करण्यात आली. त्यात सावंगी म्हाळसा (येलदरी) (ता. जिंतूर, जि.परभणी) येथील ५ मेगावॅट क्षमतेच्या सौर ऊर्जा प्रकल्पाचा समावेश होता. मौजे सावंगी म्हाळसा, ता.जिंतूर, जि.परभणी येथील गट क्र.३९ मधील १० हेक्टर जमिनीचा ताबा दि.२५.०५.२०१८ रोजी महानिर्मिती कंपनीस मिळाला. सदरच्या ठिकाणी प्रकल्पासाठीच्या मुलभूत पायाभूत सुविधा व स्थापत्य बांधकाम दि.१४.०६.२०२१ रोजी महानिर्मिती कंपनीने पूर्ण केले. महाराष्ट्र वीज नियामक आयोगाद्वारे, सदर प्रकल्पातील वीज दर अधिकचे असल्याने नव्याने निविदा प्रकाशित करावयाच्या आदेशाच्या अनुषंगाने कार्यवाही झाल्यावर दि. १३ जानेवारी, २०२० रोजी अंतिमत: वीज दरास मान्यता प्राप्त होऊन मे.वारी एनर्जी प्रा.लि. या संस्थेस दि. १८ जानेवारी, २०२० रोजी इरादा पत्र महानिर्मिती कंपनीद्वारे देण्यात आले. सदरची जमीन मे.वारी एनर्जी लि. यांना हस्तांतर करण्याची प्रक्रिया सुरु आहे व ती जून, २०२१ अखेर पूर्ण होऊन सदर प्रकल्प करारनाम्यानुसार ऑगस्ट, २०२० पर्यंत कार्यान्वित करण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात विलगीकरण केद्रात नागरिकांची गैरसोय होत असल्याबाबत**

**(२०) ११७५५ (११-०८-२०२०). श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), डॉ.राहूल आहेर (चांदवड), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कोरोना विषाणूचा वाढता प्रादूर्भाव रोखण्यासाठी रुग्णांच्या संपर्कात आलेल्या नागरीकांचे विलगीकरण करणे बंधनकारक असल्याने प्रत्येक जिल्हयात विलगीकरण केंद्राची उभारणी केली असून काही विलगीकरण केंद्रामध्ये रुग्णांची गैरसोय होत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील विशेषत: हिंगोली शहरातील सात विलगिकरण केंद्र ,शहापूर (जि.ठाणे) येथील दहागाव आश्रमशाळा व जोंधळे कॉलेज, आसनगाव विलगीकरण केंद्र,उल्हासनगर येथील विलगीकरण केंद्र, मालेगाव ( जि.नाशिक) येथील विलगीकरण केंद्र,गोंदिया जिल्हयातील पिंडकेपार ग्रामपंचायत अंतर्गत रावणघाट रविंद्रनाथ आश्रम शाळेतील विलगीकरण केंद् तसेच नागपूर येथील व्ही.एन.आय. टी. विलगीकरण केंद्रामध्ये पिण्याचे पाणी, स्वच्छ्तागृहे, वीज पुरवठा इत्यादी अनेक सुविधा उपलब्ध नसणे, अनुभवी डॉक्टर तसेच वैद्यकीय साहित्य वेळेवर न मिळणे, बायोमेडिकल वेस्ट उघड्यावर टाकणे, भोजन-नाश्ता-पाणी वेळेवर न मिळणे, निकृष्ट दर्जाचे जेवण देणे, अन्नामध्ये अळ्या असणे तसेच एकच प्रसाधनगृह व शौचालय अनेक नागरिक वापरत असल्याने जो बाधीत नाही तो बाधित होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विलगिकरण केंद्रामध्ये असलेल्या अपु-या सोयी-सुविधामुळे घरापासून विलग (क्वारंटाईन) झालले नागरिक पळून आपल्या घरी परत जाण्याचे प्रकार घडले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच, कोरोना विषाणूच्या संसर्गामुळे परदेशात अडकलेल्या भारतीय नागरिकांना मुंबईत दिनांक १० मे, २०२० रोजी वा त्यासुमारास इंग्लडहून आणल्यानंतर त्यांना विलगीकरण करण्यासाठी मुंबई-ठाण्यातील उच्च दराच्या हॉटेलमध्ये ठेवण्यात आले तथापि हॉटेलमध्ये प्रवेश करताच एकाचवेळी १४ दिवसांचे भाडे आगावू भरण्याची सक्ती हॉटेल मालकांनी केल्यानंतर व पूर्ण रक्कम भरेपर्यंत हॉटेलमध्ये प्रवेश नाकारल्यामुळे मध्यरात्री एवढ्या मोठ्या रकमेची तरतूद परदेशातून आलेल्या भारतीय नागरिकांना करणे शक्य नसल्याने त्यांची गैरसोय झाली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, विलगीकरण संदर्भात प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार असे प्रकार घडू नयेत यासाठी तातडीने विलगिकरण केंद्रमध्ये (क्वारंटाईन सेंटरवर) सर्व सोयीसुविधा उपलब्ध करून देण्याच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यासह याकडे दुर्लक्ष करणाऱ्या सबंधित अधिका-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राजेश टोपे (२८-०७-२०२१) :** (१) हे अंशत: खरे आहे.
राज्यामध्ये उभारलेल्या बहुतांशी विलगीकरण केंद्रामध्ये सर्व प्रकारच्या सेवा सुविधा समाधानकारकपणे देण्यात येत आहेत. तथापि, काही मोजक्या केद्रांमधून रुग्णांच्या गैरसोयीबद्दल सौम्य स्वरुपाच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत त्यामध्ये नागपूर शहरातील व्ही.एन.आय.टी. केंद्र, गोंदिया जिल्ह्यातील पिंडकेपार ग्रामपंचायत अंतर्गत रावणघाट रविंद्रनाथ आश्रमशाळेतील विलगीकरण केंद्रांचा समावेश आहे. प्राप्त तक्रारींनुसार स्थानिक स्तरावर कार्यवाही करण्यात आली आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.
हिंगोली जिल्ह्यातील ७ कार्यान्वीत विलगीकरण केंद्रामधून सेवा सुविधा समाधानकारक उपलब्ध करुन देण्यात येत आहेत.
ठाणे जिल्ह्यातील शहापूर येथील दहागांव आश्रमशाळा व जोंधळे कॉलेज आसनगांव विलगीकरण केंद्रामध्ये वैयक्तीक व आरोग्य विषयक सुविधा समाधानकारक पुरविल्या जात आहेत.
मालेगांव म.न.पा. कार्यक्षेत्रातील सर्व कोविड केंद्रामध्ये चहापाणी नाष्टासह वैद्यकीय उपचारासंबंधात औषधे साधन सामुग्री याबाबत कसलीही कमतरता नाही. गोंदिया जिल्ह्यातील पिंडकेपार ग्राम पंचायत अंतर्गत रावणघाट रविंद्रनाथ आश्रम शाळेतील विलगीकरण केंद्रामध्ये ३० व्यक्ती कलकत्याहून रेल्वेने रात्री ११.३० वाजता आल्यामुळे त्यांची येण्याची पूर्व सुचना नसल्यामुळे त्यांना त्या दिवशी जेवण उपलब्ध झाले नाही. परंतु दुस-या दिवशी पासून जेवणाची व्यवस्था करण्यात आली.
नागपूर शहरातील व्हीएनआयटी या विलगीकरण केंद्रामध्ये दाखल असलेल्या व्यक्तींनी जेवणाच्या दर्जाबद्दल व प्रसाधनगृहाच्या अपू-या सुविधेबाबत तक्रारी केल्या होत्या. काही विलगीकरण केंद्राबाबत प्राप्त तक्रारीनुसार स्थानिक स्तरावर कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) हे खरे नाही.
(४) हे खरे नाही.
(५) प्रश्न उदभवत नाही.
(६) प्रश्न उदभवत नाही.

---

**राज्यातील होमगार्डना आरोग्य विमा योजना लागू करण्याबाबत**

**(२१) ११८२३ (१३-०९-२०२०). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील होमगार्डना आरोग्य विमा योजना लागू करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू प्रस्तावाचे थोडक्यात स्वरूप काय आहे,
(३) असल्यास, सदरहू प्रस्तावाची अंमलबजावणी तातडीने करण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (१३-०७-२०२१) :** (१), (२) व (३) सदर प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पिंपरी-चिंचवड (जि.पुणे) येथील अनेक माध्यमाच्या अल्पसंख्याक दर्जा प्राप्त शाळांनी अनधिकृतरित्या आरटीईच्या प्राथमिक शाळांच्या यादीतून नावे वगळण्याबाबत**

**(२२) ११८७२ (१५-०८-२०२०). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने आर्थिक दुर्बल व मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आरटीई कायदा आणला असून या कायद्यानुसार खाजगी शाळेतील २५ टक्के जागा आर्थिक दुर्बल मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना राखीव ठेवण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास या राखीव जागेवर प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काची प्रतिपूर्तीची रक्कम शासनाकडुन होत असूनही अनेक शिक्षण संस्थांची उक्त शुल्काची प्रतिपूर्तीची रक्कम थकित असल्याचे निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, पिंपरी चिंचवड शहरातील ६९ नामवंत शाळांनी अल्पसंख्याक दर्जा प्राप्त करून गैरमार्गाने कोकणी, मल्याळम, कन्नड, हिंदी, पंजाबी, सिंधी, भाषा तर धार्मिक आधारावर बौद्ध, ख्रिश्चन, जैन, मुस्लिम, दर्जा असलेले प्रमाणपत्र मिळवले असून आरटीईच्या प्राथमिक शाळेच्या यादीमध्ये स्वतःची सुटका करुन घेतल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास सदर अल्पसंख्याक दर्जा प्राप्त केलेल्या शाळांमध्ये भाषिक अथवा धार्मिक शिक्षण दिले जात नसल्याचे तसेच त्या शाळेमध्ये त्या त्या समाजातील ५२ टक्के विद्यार्थी प्रवेश देणे बंधनकारक असतानाही त्याचे पालन करण्यात येत नसल्याने सदर शाळांमध्ये ५२% कोट्यातील जागा शिल्लक राहिल्या असून त्या जागा राज्य शासनाकडे प्रत्यार्पित करण्याच्या नियमाचे शाळांकडून पालन करण्यात येत नाही हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर शाळांना अल्पसंख्यांक दर्जा देताना अनेक निकष पाळले गेले नसल्याने या शाळांच्या अल्पसंख्याक दर्जाची उपसंचालक दर्जाच्या अधिकाऱ्यामार्फत उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी वारंवार पालकांकडून करण्यात येत आहे हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार पिंपरी-चिंचवड शहरातील गत आठ वर्षात अल्पसंख्याक दर्जा प्राप्त करण्यात आलेल्या शाळांचा अल्पसंख्याक दर्जा काढून घेण्याबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (०९-०७-२०२१) :** (१) हे खरे आहे.

(२) अंशतः खरे आहे.

(३) (४) व (५) हे खरे नाही.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**टोरेंटो वीज कंपनीने भिवंडी शहरातील रहिवांशाना दिलेली अवाजवी वीज देयके**

**(२३) ११९११ (१८-०८-२०२०). श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.प्रमोद (राजू) रतन पाटील (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरोनाच्या पार्श्वभूमीवर माहे मार्च, २०२० पासून संपूर्ण देशात टाळेबंदी जाहीर केलेली असल्याने संपूर्ण देशभरातील सर्वच कामकाज व व्यवहार हे पूर्णपणे नागरीकांना अडचणींचा सामना करावा लागत असतानाही भिवंडी शहरात वीजपुरवठा करणाऱ्या टोरेंटो या वीजपुरवठादार कंपनीकडून नागरिकांना अवाजवी वीज देयके पाठविण्यात आली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू वीज देयके ही नागरिकांकडून वेळेवर भरली नसल्यास त्या वीजदेयकाच्या रकमेवर व्याज आकारणी करण्याची, नागरिकांवर खोटया केसेस दाखल करण्याची व पोलीसात खोटया तक्रारी दाखल करण्याच्या धमक्या कंपनीकडून देण्यात येत असून त्यामुळे नागरिकांमध्ये मोठया प्रमाणात असंतोष निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, टोरेंटो कंपनीने माहे एप्रिल, २०२० मध्ये वा त्यादरम्यान वीज दरातही मोठया प्रमाणात वाढ केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, टाळेबंदीच्या कालावधीतील ३ महिन्यांची वीज देयके तात्काळ माफ करावी व टोरेंटो कंपनीच्या गैरकारभाराची सखोल चौकशी करून टोरेंटो पावर कंपनीचा ठेका रद्द करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी ठाणे जिल्हयाचे पालकमंत्री, जिल्हाधिकारी तसेच भिवंडी येथील तहसिलहदार यांना माहे जून, २०२० मध्ये वा त्या दरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, त्यानुष्गाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, असल्यास त्याचा तपशील काय आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत (१९-०७-२०२१) :** (१) कोरोना महामारीमुळे मार्च, २०२० पासून लॉकडाऊन कालावधीत ग्राहकांना देण्यात आलेली सर्व वीज देयके ही महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने वेळोवेळी महावितरणसाठी निर्गमित केलेल्या बहुवर्षीय वीजदर आदेशानुसार व कोविड-१९ च्या अनुषंगाने २६ मार्च, २०२० रोजी दिलेल्या मार्गदर्शक सूचनेच्या अधिन राहून देण्यात आली आहेत.

(२) महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने व शासनाने निर्गमित केलेल्या आदेशानुसार लॉकडाऊनच्या कालावधीमध्ये वीज देयकाच्या रकमेवर कोणत्याही प्रकारचे व्याज अथवा विलंब आकारणी केलेली नसून सदर कालावधीमध्ये कोणत्याही ग्राहकाचा थकबाकीसाठी वीज पुरवठा खंडीत करण्यात आलेला नाही.

(३) महाराष्ट्रातील वीज दर हे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगद्वारे (MERC) नियंत्रित केले जातात. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने मंजूर केलेले सुधारित दर दिनांक ०१ एप्रिल, २०२० पासून महाराष्ट्रात लागू आहेत.

(४) व (५) टाळेबंदीच्या कालावधीतील ३ महिन्यांची वीज देयके तात्काळ माफ करणे व

जास्तीच्या वीज बिलाच्या संदर्भात दिनांक १९.०६.२०२० रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे येथे स्थानिक लोकप्रतिनिधींच्या उपस्थितीत बैठक झालेली आहे. ग्राहकांना वीज बिल भरणे सोयीचे व्हावे यासाठी महावितरण प्रमाणेच अनेक उपाययोजना टोरंट पॉवर कंपनीतर्फे भिवंडी फ्रॅन्चायझी विभागात लागू करण्यात आल्या आहेत. त्यामध्ये माहे मार्च, २०२० चे वीज बिल भरणा करण्याची मुदत दिनांक १५.०५.२०२० पर्यंत व माहे एप्रिल, २०२० चे वीज बिल भरणा करण्याची मुदत दिनांक ३१.०५.२०२० पर्यंत कोणतेही व्याज अथवा विलंब शुल्क न आकारता देण्यात आली होती.  तसेच व्यापारी व औद्योगिक ग्राहकांचे माहे एप्रिल, मे व जून, २०२० च्या वीज देयकामध्ये स्थिर आकार स्थगित करण्यात आले होते. तसेच ज्या ग्राहकांनी "लॉकडाऊन" कालावधीतील संपूर्ण वीज बिल (थकबाकीसह) देय दिनांकापर्यंत भरले आहे. त्यांना माहे जून/जुलै, २०२० च्या (ज्या महिन्यामध्ये मीटर वाचन उपलब्ध झाले असेल) वीज देयकाच्या रकमेच्या २% परतावा देण्यात आला व ज्या ग्राहकांना माहे जून २०२० चे बिल एकरकमी भरणे आर्थिकदृष्ट्या शक्य नाही अशा ग्राहकांना सदर वीज बिल जून/जुलै, २०२० तीन हप्त्यामध्ये भरण्याची सुविधादेखील उपलब्ध करुन देण्यात आलेली होती. त्याचप्रमाणे मे.टोरंट पॉवर कंपनीकडून, भिवंडी फ्रॅन्चाइझी क्षेत्रातील सर्व ग्राहकांना लॉकडाऊन कालावधीत दिलेल्या बिलांबाबत मार्गदर्शन व स्पष्टीकरण विविध माध्यमांद्वारे उदा. सोशल मिडियावरील व्हिडिओ, रहिवाशी सोसायटीमधील शिबीरे,वृत्तपत्रांचे लेख, वेबिनार इ. द्वारे केले गेले.

(६) प्रश्न उद्भवत नाही

---

**कुडूस (ता.वाडा, जि. पालघर) येथील कंत्राटी कामगारांना वेतन अदा करण्याबाबत**

**(२४) ११९१४ (२०-०९-२०२०). श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाडा (जि. पालघर) तालुक्यातील येथील कुडूस ग्रामपंचायतीच्या हद्दीतील हिंदुस्तान कोकाकोला कंपनीमध्ये ३८० कंत्राटी कामगारांवर करोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी शासनाने जाहीर केलेल्या टाळेबंदीमुळे उपासमारीची वेळ आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हिंदुस्तान कोकाकोला कंपनी गेले अनेक वर्षांपासून शितपेय बनवणारी कंपनी असून कामगारांना त्यांचे नियमित वेतन अदा करण्याबाबत शासनाच्या आदेशाचे पालन न करता माहे एप्रिल, २०२० या महिन्याचे वेतन देण्यास टाळाटाळ केल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, टाळेबंदीच्या काळातही कामगांराना त्यांचे नियमित वेतन न देणाऱ्या कंपनीच्या विरोधात तसेच वेतन अदा करावे असा आदेश असतांनाही कामगारांचे माहे एप्रिल, २०२० या महिन्याचे वेतन अद्याप न मिळाल्याने कामगारांनी तहसीलदार यांच्याकडे निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी कामगारांनी दिलेल्या निवेदनातील मागणीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी करुन कामगारांना वेतन अदा करणे तसेच कंपनीवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. हसन मुश्रीफ (१९-०७-२०२१) :** (१) व (२) हे खरे नाही.
एप्रिल २०२० या महिन्यातील कंत्राटी कामगारांची सरासरी उपस्थिती ५१ असतानादेखील २२९ कामगारांना एप्रिल २०२० महिन्याचे वेतन रक्कम रु. ४८,०९,६७०/- कंत्राटदारामार्फत देण्यात आल्याचे व्यवस्थापनाने कळविले आहे.
(३) स्थानिक कामगार संघ या संघटनेने दि. ११.मे, २०२० रोजीचे निवेदन तहसिलदार वाडा यांना अग्रेषित केले असून त्याची प्रत कामगार उप आयुक्त, पालघर या कार्यालयास प्राप्त झालेली आहे.
(४) स्थानिक कामगार संघ या संघटनेच्या दि. ११.मे,२०२० रोजीच्या निवेदनाच्या अनुषंगाने उचित कार्यवाही करुन अहवाल सादर करण्याची सूचना कामगार उप आयुक्त, पालघर यांनी दि. १२ मे,२०२० रोजीच्या पत्रान्वये कंपनी व्यवस्थापनास दिली होती. कंपनी व्यवस्थापनाने दि. २२ मे,२०२० व दि. १२ जून,२०२० रोजीच्या पत्रान्वये एप्रिल, २०२० या महिन्यातील कंत्राटी कामगारांची सरासरी उपस्थिती ५१ असतानादेखील, २२९ कंत्राटी कामगारांना एप्रिल, २०२० महिन्याचे वेतन रक्कम रु.४८,०९,६७०/- कंत्राटदारामार्फत देण्यात आल्याचे कामगार उप आयुक्त, पालघर यांना कळविले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील अपंगांची तालुकास्तरावर वैद्यकीय तपासणी करुन**
**अपंग प्रमाणपत्र उपलब्ध होणेबाबत**

**(२५) १२०७५ (१०-०९-२०२०). श्री.अशोक पवार (शिरुर), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी), श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील अंपग नागरीकांना अपंगत्वाचे प्रमाणपत्र प्राप्त करुन घेण्यासाठी आयोजित करण्यात येणारे वैद्यकीय तपासणीचे शिबीर हे जिल्हयाच्या ठिकाणी आयोजित करण्यात येतात, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तालुकास्तरावर वैद्यकीय तपासणीचे शिबीर आयोजित होत नसल्याने अपंग प्रमाणपत्र तालुका स्तरावर उपलब्ध होत नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अपंगत्वाचे प्रमाण ९० ते १०० टक्के असणाऱ्या अपंगाना जिल्हयाच्या ठिकाणी नेण्यास अडचणी येतात, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, राज्यातील अपग नागरीकांना अपंगत्वाचे प्रमाणपत्र मिळणे सुलभ होण्यासाठी आयोजित करण्यात येणरे वैद्यकीय तपासणीचे शिबीर हे तालूकास्तरावर आयोजित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राजेश टोपे (२६-०७-२०२१) :** (१) व (२) हे खरे नाही.
सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन परिपत्रक क्र. अप्रवि-२०१२/प्र.क्र.२९७/आरोग्य-६, दिनांक ३१ डिसेंबर, २०१२ अन्वये अपंगत्वाची तपासणी, मुल्यमापन व अपंगत्व प्रमाणपत्र वितरण संबंधित रुग्णालयामधून होणे आवश्यक आहे. यास्तव कोणत्याही कारणासाठी आयोजित

केलेल्या शिबिरांमध्ये अपंगत्वाची तपासणी, मुल्यमापन व प्रमाणपत्राचे वितरण करण्यात येऊ नये अशा सूचना देण्यात आल्या आहेत. दिव्यांग प्रमाणपत्र देण्यासाठी संबंधित विभागाचे तज्ञ उपलब्ध असल्यास त्या ठिकाणी दिव्यांग तपासणी करण्यात येऊन प्रमाणपत्र वितरीत करण्यात येते. राज्यात ९६ ठिकाणी दिव्यांग प्रमाणपत्र सुविधा उपलब्ध आहे. त्यापैकी तालुका स्तरावरील एकूण ३५ रुग्णालयात प्रमाणपत्र देण्यात येतात.

(३) हे खरे आहे.

तथापि केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार दिव्यांग व्यक्तींची तपासणी होणे आवश्यक असल्याने दिव्यांगत्वाची तपासणी व मुल्यमापनासाठी संबंधित रूग्णालयातील वैद्यकीय मंडळासमोर हजर रहाणे आवश्यक आहे.

(४) दिव्यांग प्रमाणपत्र देण्यासाठी संबंधित विभागाचे तज्ञ उपलब्ध असल्यास त्या ठिकाणी दिव्यांग तपासणी करण्यात येऊन प्रमाणपत्र वितरीत करण्यात येते. सद्यस्थितीत तालुकास्तरावर ३५ रुग्णालयात प्रमाणपत्र देण्यात येतात.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोकणातील वादळग्रस्तांना नुकसान भरपाई देण्याबाबत**

**(२६) १२१४१ (२५-०९-२०२०). श्री.योगेशदादा कदम (दापोली) :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकणात गत ९ महिन्यांमध्ये समुद्रामध्ये झालेल्या वादळामुळे दापोली मतदार संघातील मच्छिमार बांधवांच्या बोटींचे व होडयांचे मोठया प्रमाणात नुकसान झाले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या वादळामुळे मासेमारी व विक्री व्यवसाय बंद असून शासनाकडून कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई मिळालेली नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अस्लम शेख (२९-०७-२०२१) :** (१) हे खरे आहे.

राज्याच्या सागरी किनारपट्टीवर “क्यार” चक्रीवादळ, “महा” चक्रीवादळ, “निसर्ग” चक्रीवादळाचा निर्माण झाले होते. सदरील चक्रीवादळांचा तडाखा राज्याच्या सागरी किनारपट्टीवरील मच्छीमारांना बसलेला आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

राज्यातील सागरी मच्छीमारांना क्यार, महा चक्रीवादळामुळे पुर्ण क्षमतेने मासेमारी करता आलेली नसल्यामुळे रु.६५.१७२ कोटी इतके विशेष आर्थिक सहाय्य मंजूर करण्यांत आलेले आहे., सदर मंजूर विशेष आर्थिक सहाय्यापैकी ५० टक्के निधी सर्व सागरी जिल्हा कार्यालयांस वितरीत करण्यांत आलेला असुन, रत्नागिरी जिल्हयासाठी रु.४.५० कोटी एवढे अनुदान वितरीत करण्यात आले आहे.

निसर्ग चक्रीवादळामुळे झालेल्या नुकसानीबाबतची कार्यवाही महसुल विभागामार्फत सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोरोनाच्या काळातील वीजदेयके माफ करण्याबाबत.**

**(२७) १२३९६ (१३-०९-२०२०). श्रीमती श्वेता महाले (चिखली), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कोरोनाविषाणुचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी लागू करण्यात आलेल्या लॉकडाउनमुळे शेतकरी, शेतमजूर, हमाल, ऑटो रिक्षाचालक, टॅक्सीचालक, सर्व वाहनचालकवर्ग, बांधकाम मजूर, खाजगी गॅरेज, खाजगी दुकाने व लघु व्यावसायी वर्ग यांचे काम बंद झाल्याने अतोनात हाल झाल्याचे माहे मे, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहु नागरीकांचे कोरोनाच्या काळातील वीज देयक माफ करावे अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा. ऊर्जा मंत्री महाराष्ट्र राज्य यांच्याकडे दिनांक २ मे, २०२० रोजी वा त्यासुमारास आपले सरकार पोर्टलवरुन केली आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. नितिन राऊत (१९-०७-२०२१) :** (१) देशभरात सुरु असलेल्या कोविड-१९ या महामारीस प्रतिबंध करण्याच्या उद्देशाने केंद्र शासनाने दिनांक २४.०३.२०२० पासून संपूर्ण देशात लॉकडाऊन जाहीर करण्यात आला होता. औद्योगिक व वाणिज्यिक आस्थापना/संस्था या बंद ठेवण्यात आल्या होत्या.

(२) हे खरे आहे.

(३) ग्राहकांना लॉकडाऊन काळात वीज देयकावरील व्याज व विलंब आकाराचा भुर्दंड बसू नये म्हणून महावितरणने मार्च, २०२० चे वीज बिल भरणा करण्याची मुदत दिनांक १५.०५.२०२० पर्यंत तसेच माहे एप्रिल, २०२० चे वीज बिल भरणा करण्याची मुदत दिनांक ३१.०५.२०२० पर्यंत वाढवून दिलेली होती. लॉकडाऊनच्या काळात व्यापारी व औद्योगिक वीज ग्राहकांचे, माहे एप्रिल, मे व जून, २०२० च्या वीज देयकामध्ये लागू असलेले, स्थिर आकार स्थगित करण्यात आले होते व ते अनुक्रमे माहे ऑगस्ट, सप्टेंबर व ऑक्टोबर, २०२०या महिन्यांच्या वीज देयकांमध्ये समाविष्ट करण्यात आले. ज्या घरगुती ग्राहकांचे लॉकडाऊन नंतर प्रत्यक्ष मिटर वाचनाप्रमाणे बीले आले अशा ग्राहकांनी त्यांचे संपूर्ण वीज बील एकरकमी भरले तर त्यांना देय रक्कमेवर २% सवलत देण्यात आली.

तसेच ज्या ग्राहकांना वीज बिलाचा भरणा एक रक्कमी भरणे शक्य झाले नाही त्यांना ती रक्कम तीन सुलभ हप्त्यात भरण्याची सुविधा देण्यात आली.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वाळवा तालुक्यातीय जरबेरा फुलांच्या शेतीचे झालेले नुकसान**

**(२८) १२४९७ (१३-०९-२०२०). श्री.मानसिंग नाईक (शिराळा) :** सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाळवा तालुक्यातील (जिल्हा सांगली) शेतकऱ्यांनी लाखो रुपये कर्ज काढून हरित गृहामध्ये केलेल्या जरबेरा फुलांच्या शेतीचे कोरोनामुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचे माहे एप्रिल, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने या शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानीचा पंचनामा करून त्यांना आर्थिक मदत करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, सर्व बाधित शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची काय कारणे आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे (२९-०७-२०२१) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

(२) व (३) कोरोनाच्या पार्श्वभूमीवर करण्यात आलेल्या लॉकडाऊनमुळे शेतकऱ्यांच्या झालेल्या आर्थिक नुकसानीची भरपाई देण्याची तरतूद कृषी तथा फलोत्पादन विभागांतर्गत सुरु असलेल्या कोणत्याही प्रचलित योजनेत नाही किंवा अशा प्रकारे झालेल्या नुकसानीची भरपाई देण्यासाठी कृषी विभागांतर्गत स्वतंत्र योजना अस्तित्वात नसल्यामुळे कोरोना लॉकडाऊन कालावधीत लॉकडाऊनमुळे झालेल्या नुकसानीची पाहणी /आढावा/ चौकशी किंवा पंचनामा कृषी विभागामार्फत करण्यात आलेला नाही. वरील परिस्थितीत बाधीत शेतकऱ्यांना आर्थिक मदत करणे शक्य होणार नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील द्राक्ष व लिंबू उत्पादक शेतक-यांना नुकसान भरपाई देण्याबाबत**

**(२९) १३०४५ (१२-०८-२०२०). डॉ.राहूल आहेर (चांदवड), श्री.बबनराव पाचपुते (श्रीगोंदा), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कोरोनाच्या टाळेबंदीमुळे द्राक्ष उत्पादकांचा अडीच ते तीन लाख टन माल पडून राहिल्यामुळे द्राक्ष उत्पादक शेतक-यांचे सुमारे ९०० कोटी रुपयांचे नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, श्रीगोंदा (जि.अहमदनगर) तालुक्यातील द्राक्ष व लिंबू उत्पादक शेतक-यांचे सुमारे १५० कोटी पेक्षा अधिक नुकसान झाल्याचे कृषी विभागाने केलेल्या पाहणीत माहे एप्रिल व मे, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, कोरोनामुळे ऐन काढणीला आलेली द्राक्षे शेतकऱ्यांना शेतातच ठेवावी लागल्यामुळे माहे मार्च, २०२० मध्ये वा त्यादरम्यान द्राक्षे १५ रुपये किलो दराने व लिंबू ५ रुपये किलो दराने विकावी लागल्याने शेतकऱ्यांचे मोठया प्रमाणात नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन नुकसानग्रस्त द्राक्ष व लिंबू उत्पादक शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे (२९-०७-२०२१) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.
(२) व (३) कोरोना प्रादुर्भावामुळे जाहीर झालेल्या लॉकडाऊनमध्ये श्रीगोंदा (जि. अहमदनगर) तालुक्यातील द्राक्ष व लिंबू उत्पादक शेतकऱ्यांना फळांची स्थानिकरित्या विक्री करावी लागल्याने दर कमी मिळाल्यामुळे आर्थिक नुकसान झाले. यासंदर्भात कृषी विभागाने नुकसानग्रस्त क्षेत्राची पाहणी केलेली नाही तथापि, दर कमी मिळाल्यामुळे काही प्रमाणात आर्थिक नुकसान झाले आहे.
(४) कोरोनाच्या पार्श्वभूमीवर करण्यात आलेल्या लॉकडाऊनमुळे शेतकऱ्यांच्या झालेल्या आर्थिक नुकसानीची भरपाई देण्याची तरतूद कृषी तथा फलोत्पादन विभागांतर्गत सुरु असलेल्या कोणत्याही प्रचलित योजनेत नाही किंवा अशा प्रकारे झालेल्या नुकसानीची भरपाई देण्यासाठी कृषी विभागांतर्गत स्वतंत्र योजना अस्तित्वात नाही. त्यामुळे कोरोना लॉकडाऊन कालावधीत लॉकडाऊनमुळे झालेल्या नुकसानीची पाहणी/आढावा/ चौकशी किंवा पंचनामा कृषी विभागामार्फत करण्यात आलेली नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**श्रीगोंदा (जि.अहमदनगर) तालुक्यामध्ये विज पुरवठा खंडीत होत असल्याबाबत**

**(३०) १३०४६ (१३-०९-२०२०). श्री.बबनराव पाचपुते (श्रीगोंदा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) श्रीगोंदा, (जि.अहमदनगर) तालुक्यामध्ये वारंवार वीज पुरवठा खंडीत होत असल्याचे माहे मे, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वारंवार वीज खंडीत होत असल्याने शेतकऱ्यांचे व सामान्य नागरिकांचे हाल होत असल्याने उक्त प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे,
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने विज पुरवठा नियमित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत (१९-०७-२०२१) :** (१), (२), (३) व (४) श्रीगोंदा तालुक्यात मे, २०२० मध्ये दिनांक ०१.०५.२०२०, १०.०५.२०२० व ३०.०५.२०२० रोजी वादळासह अवकाळी पावसामुळे उच्चदाब व लघुदाब वाहिनींचे तारा व खांब यांचे नुकसान होऊन वीज पुरवठा खंडीत झाला होता. सदरचा खंडीत झालेला वीज पुरवठा कोविड-१९ साथीच्या काळात संपूर्ण तालुक्यात टाळेबंदी लागू असतांनाही संबंधित कर्मचारी यांनी तातडीने योग्य ती उपाययोजना करुन सुरु केला होता. काही अपवाद तसेच क्षणिक व्यत्यय वगळता अखंडीत होता. वरील कालावधीत वीज पुरवठा सुरळीत करण्यात आल्यानंतर कृषी ग्राहकांनी एकाचवेळेस वीज पंप सुरु केल्यामुळे वाहिन्या अतिभारीत होऊन वीज पुरवठा खंडीत झाला होता. तथापि, योग्य त्या उपाययोजना करण्यात येऊन वीज पुरवठा पूर्ववत करण्यात आला.

---

**डोंबिवली (जि.ठाणे) येथील प्रदुषण करणाऱ्या २० कंपन्यावर कारबाई करणेबाबत**

**(३१) १३१३१ (१९-०७-२०२०). श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड) :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डोंबिवली (जि.ठाणे) मधील महाराष्ट्र औदयोगिक विकास महामंडळातील प्रदूषण करणाऱ्या २० कंपन्यांवर माहे फेब्रुवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान कारवाई करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कंपन्यांवर केलेल्या कारवाईचे स्वरूप काय आहे तसेच कंपन्यांनी सद्य:स्थितीत प्रदूषण कमी करण्याबाबत कोणत्या उपाययोजना केल्या आहेत वा करण्यात येत आहेत

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. आदित्य ठाकरे (२०-०७-२०२१) :** (१) हे खरे आहे.

(२) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत माहे फेब्रुवारी, २०२० दरम्यान डोंबिवली, जि. ठाणे येथील महाराष्ट्र औदयोगिक विकास महामंडळाच्या क्षेत्रातील उद्योगांची पाहणी करण्यात आली होती.

• सदर पाहणीदरम्यान आढळून आलेल्या त्रुटींच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत २१ उदयोगांना उत्पादन बंद करणे, ४१ उदयोगांना कारणे दाखवा नोटीस व ०३ उदयोगांना अंतरिम आदेश देण्यात आले होते.

• उत्पादन बंद करण्यात आलेल्या सदर २१ उद्योगांपैकी १७ उदयोगांनी आवश्यक ती प्रदूषण नियंत्रण यंत्रणा उभारणी / सुधारणा केल्यानंतर त्यांना अटी व शर्तीसह पुन्हा उत्पादन सुरु करण्याबाबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत परवानगी देण्यात आली असून सद्य:स्थितीत उर्वरित ०४ उद्योग बंद आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सातारा येथील जिल्हा शासकीय रुग्णालय येथे मेट्रो ब्लड बँक स्थापन करण्याबाबत**

**(३२) १३२२२ (११-०८-२०२०). श्री.दिपक चव्हाण (फलटण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा येथील जिल्हा शासकीय रुग्णालयामध्ये रक्त विघटनाची सोय उपलब्ध करण्याचा शासनाने निर्णय घेऊन त्यासाठी मेट्रो ब्लड बँक स्थापन करण्याचा निर्णय माहे जून,२०१४ मध्ये घेतला असुन सदरहू ब्लड बँक उभारणीसाठी स्वतंत्र इमारत माहे जुलै,२०१६ मध्ये बांधण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सध्याच्या कोरोना विषाणूच्या संसर्गाच्या संकटकाळात कोरोना रुग्णाचे स्वॅब चाचणीसाठी पुणे येथे पाठवावे लागत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने मेट्रो ब्लड बँक उभारणीचा निर्णय घेऊन व त्याकरिता स्वतंत्र इमारतदेखील बांधण्यात आलेली असताना सदरची मेट्रो ब्लड बँक अद्याप कार्यान्वीत न करण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार मेट्रो ब्लड बँक कार्यान्वीत करण्यास विलंब लावण्या-या  संबंधितांविरुध्द कारवाई करणेसह सदरहू ब्लड बँक तत्काळ कार्यान्वीत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे (०६-०८-२०२१) :** (१) होय हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

कोरोना बाबतची स्वॅब चाचणी ही ब्लड बँकेत होत नाही तथापि तात्कालीन परिस्थितीत कोविड संशयीत रुग्णांचे स्वॅब चाचणीसाठी पुणे येथे पाठवावे लागत होते परंतु दि. ६.७.२०२० च्या आदेशांनुसार सातारा येथे RT-PCR तपासणी प्रयोगशाळेस मान्यता दिली असून ती कार्यान्वीत झालेली आहे.

(३)  रक्तपेढी आधुनिकीकरण करण्यासाठी एकूण १७ यंत्रसामुग्रीची गरज लागते, त्यानुसार राज्य रक्त संक्रमण परिषदेने राज्यातील १० मेट्रो ब्लड बँकेसाठी (ज्यामध्ये साताऱ्याचा देखील समावेश आहे) यंत्रसामुग्री खरेदीचा मेसर्स हाफकिनस बायोफार्मास्युटीकल्स यांना दिनांक ३१.०८.२०१८ रोजी पाठविलेला आहे. सदरच्या १७ यंत्रसामुग्रीपैकी आतापर्यंत १० यंत्रसामुग्री उपलब्ध झालेली आहेत व उर्वरित ७ यंत्रसामुग्री प्राप्त होताच अन्न व औषध प्रशासन विभागाकडून परवाना प्राप्त करून मेट्रो ब्लड बँक कार्यान्वित करण्यात येईल.

(४)  मेट्रो ब्लड बँक कार्यान्वित करण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्यात आलेली आहे.

(५)  प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात आंबा, चिकू,नारळ, सुपारी व काजू इ. बागांयतदारांना आकारण्यात येणाऱ्या वीज देयकांबाबत

**(३३) १३२८१ (१३-०९-२०२०). श्री.शेखर निकम (चिपळूण) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात आंबा, चिकू, नारळ, सुपारी व काजू इ. बागांसाठी व शेतीपूरक व्यवसायांची वीज देयके सन २०१८ पर्यंत कृषी पंप गृहीत धरून आकारली जात होती परंतु दिनांक १ एप्रिल, २०१८ पासून सदरची देयके कृषी इतर दिनांक १ एप्रिल, २०१५ पासूनच्या वाढीव दराने आकारली जात आहेत हे खरे आहे काय.

(२) असल्यास, फळ बागांना व शेतीपूरक व्यवसायांसाठी वापरल्या जाणाऱ्या वीज पंपांची देयके ही कृषी पंप म्हणून आकारली जावीत असे मा. उच्च न्यायालयाने १९१९८/२०१३ या रिटच्या निकालात म्हटले आहे हे ही खरे आहे काय.

(३) असल्यास, महावितरण कंपनीने ऊस लागवड व भाजीपाला लागवडी प्रमाणे रोपवाटिका तसेच फळ बागा यांना देखील शेतीपूरक व्यवसायांसाठी वापरल्या जाणाऱ्या वीज पंपांची बिले कृषी पंप म्हणून आकारली जावीत यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४)  नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत

**डॉ. नितिन राऊत (१९-०७-२०२१) :** (१) महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने वीज दर आदेश क्र.१२१/२०१४, दिनांक २६.०६.२०१५ पासून फळबाग व शेती पूरक कारणांसाठी वापरात असलेल्या वीज वापरांची वर्गवारी “कृषीइतर” मध्ये समाविष्ट केली आहे.
(२) रोपवाटिका (नर्सरी) हा कृषी संबंधित उद्योग असल्याने सदर याचिकाकर्ता ग्राहकाला नर्सरी हे व्यावसायिक उद्योग समजून शुल्क आकारणी करु नये असे मा. उच्च न्यायालयाने त्यांच्या याचिका क्र.WPST/१९१९८/२०१३ च्या निकालात नमूद केले आहे.
(३) रोपवाटिका व फळ बाग याचे वर्गीकरण मा.विद्युत नियामक आयोगाने वीज दर आदेश दिनाक २६.०६.२०१५ पासून “कृषीइतर” या नव्याने अंतर्भूत असलेल्या वर्गवारीत केल्याने त्यांना “कृषीइतर” प्रमाणे आकारणी होत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नवी मुंबई येथील नोंदणीकृत संस्थांचे खजिनदार तथा सचिव यांनी केलेला आर्थिक गैरव्यवहार व अनियमितता

**(३४) १३४८१ (१७-०९-२०२०). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवी मुंबई, नेरुळ, सेक्टर २३ अंतर्गत श्री गणेश कृपा सहकारी गृहनिर्माण संस्था तथा अन्य अनेक सेक्टर अंतर्गत असलेल्या नोंदणीकृत संस्थांचे खजिनदार तथा सचिव यांनी त्या संस्थेमध्ये आर्थिक गैरव्यवहार व अनियमितता केल्याप्रकरणी संबंधित सहकारी संस्थानी तत्कालीन सहकार मंत्री, अप्पर मुख्य सचिव व सह निबंधक, सहकारी संस्था, सिडको, बेलापूर यांना दिनांक ३१ जुलै, २०१७, दिनांक १९ ऑगस्ट, २०१७ व दिनांक ६ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे मागणी करुन अद्यापही कोणतीही कारवाई केली नसल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त गृहनिर्माण संस्थांची प्रामुख्याने गैरव्यवहार व अनियमितता याबाबत चौकशी व त्यानुषंगाने कार्यवाहीची मागणी असतानाही संस्थेचा कारभार सुव्यवस्थित सुरु असूनही ही बाब दुर्लक्षित करुन सिडको प्राधिकरणाने माहे नोव्हेंबर, २०१८ मध्ये व त्यादरम्यान या संस्थांचा संपूर्ण कारभार ताब्यात घेऊन त्या संस्थांवर प्राधिकृत अधिकाऱ्यांची फक्त कार्यकारिणी निवडणूकीसाठी ३ महिन्यांसाठी नेमणूक केली व त्यांनीही त्या कालावधीत कोणतेही आवश्यक काम न करता फक्त मानधन व इतर खर्च वसूल करुन स्वमताने अनावश्यक खर्च करुन पूर्ण १ वर्षे संस्थांचा कारभार स्वत:कडेच ठेवला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यादरम्यान संस्था सदस्यांनी दिनांक १४ जानेवारी, २०१९ रोजी वा त्यासुमारास केलेल्या वैयक्तिक तक्रारी प्रकरणी प्राधिकृत अधिकारी व सिडको प्रशासन यांनी कोणतीही विधीवत दखल घेतलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित दोषी संस्था पदाधिकारी, प्राधिकृत अधिकारी व सिडको प्राधिकरण अधिकारी यांच्यावर कारवाई करण्याबाबत तसेच बाधित संस्थाना न्याय देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (१२-०७-२०२१) :** (१) हे खरे नाही.

नवी मुंबई, नेरुळ, सेक्टर २३ अंतर्गत श्री गणेश कृपा सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या सभासदांनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने सहनिबंधक, सहकारी संस्था, सिडको या कार्यालयात सुनावण्या घेतलेल्या असून त्यानुषंगाने आदेशही पारित करण्यात आलेले आहेत.

(२) हे खरे नाही.

सहनिबंधक, सहकारी संस्था, सिडको या कार्यालयाच्या दि.१४.११.२०१८ रोजीच्या आदेशान्वये कलम ७७अ अन्वये श्री गणेश कृपा सहकारी गृहनिर्माण संस्था या संस्थेवर प्राधिकृत अधिकाऱ्याची नियुक्ती केली होती. संस्थेच्या सभासदांच्या दि.२५.११.२०१९ रोजीच्या विनंती पत्रानुसार सहनिबंधक, सहकारी संस्था, सिडको या कार्यालयाने ७७अ अन्वयेच्या आदेशात अंशत: बदल करुन, संस्थेची त्रिसदस्य प्राधिकृत अधिकारी समिती निर्माण केली. तसेच, दि.१३.१२.२०१९ रोजीच्या आदेशाव्दारे प्राधिकृत अधिकारी यांनी संस्थेच्या नियुक्त त्रिसदस्यीय समितीकडे पदभार हस्तांतरित केलेला आहे.

(३) व (४) हे खरे नाही,

दि.१४.०१.२०१९ रोजीचा तक्रार अर्ज सहनिबंधक, सहकारी संस्था, सिडको या कार्यालयास प्राप्त नाही. तथापि, दि.२५.०७.२०१९ रोजीच्या तक्रार अर्जावर सहनिबंधक, सहकारी संस्था, सिडको यांच्याकडे सुनावणी चालू आहे. सुनावणी दरम्यान तक्रारदारांनी दि.१४.०१.२०२० रोजी म्हणणे दाखल केले असून, त्यानुसार दि.३१.०३.२०२० रोजी पुढील सुनावणी आयोजित केली होती. मात्र लॉकडाऊन झाल्याने सिडको कार्यालयात अभ्यागतांना भेटण्यास बंदी घातलेली होती. सद्य:स्थितीत ऑनलाईन प्रणालीव्दारे सुनावण्या आयोजित केलेल्या असून, सदर प्रकरणी सुनावणी अंती योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पालघर जिल्हयातील फुल बागायतदारांचे लॉकडाऊन मुळे झालेले नुकसान**

**(३५) १३५०१ (१४-०९-२०२०). श्री.विनोद निकोले (डहाणू) :** सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यात विविध प्रकारच्या फुलांची शेती करणारे बागायतदार असून त्याच्यावर अवलंबून असलेली विक्रेते, मजुरांची कुटुंबे फुलांची वाहतूक करणारे ट्रान्सपोर्टर इ. अन्य व्यावसायिक व फुले शेती बागायतदारांचे लॉकडाऊनमुळे आर्थिक नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त फुले शेती बागायतदार व अन्य लोकांवर उपासमारीची वेळ आली असताना अद्यापपर्यंत शासनाकडून कोणतीही आर्थिक मदत दिली गेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्याअनुषंगाने पालघर जिल्हयातील नुकसानग्रस्तांना आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत

**श्री. संदीपानराव भुमरे (२९-०७-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) कोरोनाच्या पार्श्वभूमीवर करण्यात आलेल्या लॉकडाऊनमुळे शेतकऱ्यांच्या झालेल्या आर्थिक नुकसानीची भरपाई देण्याची तरतूद कृषी तथा फलोत्पादन विभागांतर्गत सुरु असलेल्या कोणत्याही प्रचलित योजनेत नाही किंवा अशा प्रकारे झालेल्या नुकसानीची भरपाई देण्यासाठी कृषी विभागांतर्गत स्वतंत्र योजना अस्तित्वात नाही. त्यामुळे कोरोना लॉकडाऊनमुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देणे शक्य होणार नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**वाघोड (ता. रावेर, जि.जळगांव) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील कर्मचारी बनावट स्वाक्षऱ्या करून वेतन घेत असल्याबाबत.**

**(३६) १३८१७ (१४-०९-२०२०). श्री.शिरीष चौधरी (रावेर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१).वाघोड (ता. रावेर,जि.जळगांव) येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या प्रयोगशाळा तंत्रज्ञ, महिला कर्मचारी अनेक वर्षापासून कर्तव्यावर नसून त्यांच्या बनावट स्वाक्षऱ्या करून वेतन वेळेवर काढत असल्याची तक्रार दिनांक ३ मे,२०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली ,हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, त्यानुसार शासनाने संबधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राजेश टोपे (२०-०७-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.
दैनिक लोकमत, जळगाव या वृत्तपत्रामध्ये दि.०३.०५.२०२० रोजी या विषयीची बातमी प्रसिध्द झाली होती.
(२) सदर प्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद जळगाव यांनी गट विकास अधिकारी, पंचायत समिती, रावेर यांना चौकशी करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार त्यांनी दि.१२.०५.२०२० रोजी प्राथमिक आरोग्य केंद्राला भेट देवून चौकशी अहवाल सादर केला आहे.
(३) सदर महिला कर्मचाऱ्याला निलंबित करून गैरहजर कालावधीच्या पगाराची वसुली करण्याबाबत जिल्हा परिषदेने निर्णय घेवून तसे पत्र जिल्हा हिवताप अधिकारी, जळगाव यांना दि.३१.०७.२०२० रोजी दिले आहे.त्यानुसार पुढील कार्यवाही जिल्हा हिवताप अधिकारी, जळगाव यांच्याकडून करण्यात येत आहे.
(४) कार्यवाही सुरू आहे.

---

**वासिंद (ता.शहापूर, जि.ठाणे) ग्रामपंचायत हद्दीतील जिंदाल स्टिल कोटेड प्रा.लि.ही कंपनी विषारी रसायनयुक्त पाणी सोडत असल्याबाबत**

**(३७) १३८७३ (१९-०७-२०२०). श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वासिंद (ता.शहापूर, जि.ठाणे) ग्रामपंचायत हद्दीतील जिंदाल स्टिल कोटेड प्रा.लि. या कंपनीने विषारी रसायनयुक्त पाणी सोडल्यामुळे सारमाळ ओहोळ पात्रातील शेकडो मासे मृत्युमुखी पडल्याची घटना माहे जुलै, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू कारखान्यातून उत्सर्जित करण्यात येणाऱ्या सांडपाण्यावर प्रक्रिया करण्याबाबत आवश्यक संयंत्र संबंधित कंपनीकडे कार्यरत आहे किंवा नाही याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले आहे, त्यानुषंगाने संबंधित कंपनीवर तसेच कंपनीतून उत्सर्जित करण्यात येणाऱ्या रसायनयुक्त दुषित सांडपाण्यावर कोणतीच प्रक्रिया कंपनीकडून करण्यात येत नसताना याकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित शासकीय अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. आदित्य ठाकरे (२०-०७-२०२१) :** (१) प्रश्नाधिन विषयाबाबतची तक्रार दिनांक ०२/०७/२०२० रोजी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे प्राप्त झाली होती.

(२) व (३) सदर तक्रारीच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत केलेल्या पाहणीदरम्यान जिंदाल स्टिल कोटेड प्रा. लि. या उद्योगाचे सांडपाणी प्रक्रिया संयंत्रणा कार्यरत असल्याचे तसेच उद्योगातून कोणत्याही प्रकारचे सांडपाणी परीसराबाहेर जात नसल्याचे आढळून आले होते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नाशिक येथील होरयझन ॲकॅडमी शाळेने फि न भरलेल्या विद्यार्थ्यांना शिकण्यापासुन वंचित ठेवल्याबाबत**

**(३८) १४००१ (१३-०९-२०२०). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) होरयझन ॲकॅडमी नाशिक या शाळेमध्ये विद्यार्थ्यांनी फी न भरल्यामुळे ऑनलाईन शिकवणी बंद केल्याचे माहे जुलै, २०२० मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास उपरोक्त प्रकरणांची चौकशी करण्यात आली आहे काय, तद्नुसार चौकशीत काय निष्पन्न झाले आहे,

(३) असल्यास, होरायझन ॲकॅडमी शाळेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**प्रा. वर्षा गायकवाड (१६/९/२०२१) :** (१) हे खरे आहे.

(२) (३) व (४) सदर प्रकरणाच्या चौकशी साठी शाळेने अभिलेख उपलब्ध करुन दिले नसल्यामुळे कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. तसेच फी न भरण्याच्या कारणास्तव विदयार्थी शिक्षणापासून वंचित राहणार नाही याची दक्षता घेण्याची समज शाळेला देण्यात आली असुन, शाळेने विदयार्थ्यांना ऑनलाईन शिक्षणापासून वंचित ठेवणार नसल्याबाबत हमीपत्र लिहून दिले आहे.

---

**बामणवाडा (ता.राजुरा, जि.चंद्रपूर) येथे बनावट आदिवासी प्रमाणपत्र सादर करून जमीन खरेदीत केलेला गैरव्यवहार**

**(३९) १४३४१ (१५-०९-२०२०). श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बामणवाडा (ता.राजुरा, जि.चंद्रपूर) येथील श्री.पवन चिंतल यांनी आदिवासी असल्याचे बनावट प्रमाणपत्र सादर करून आदिवासीसाठी असलेली जमीन बळकावली असल्याने त्यांच्याविरुध्द सखोल चौकशी करण्याबाबत लोकप्रतिनिधी बल्लारपूर यांनी आदिवासी विकास मंत्री यांना दिनांक १४ जुलै, २०२० रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,,चौकशीत काय आढळुन आले,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने संबधित दोषीवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. के.सी.पाडवी (१२-७-२०२१) :** (१) होय

(२) व (३) सदर निवेदनाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, चंद्रपूर व उप विभागीय अधिकारी, राजूरा यांचे अभिप्राय मागविले असता, उप विभागीय अधिकारी, राजूरा यांनी विक्रीदाराची निकड विचारात घेऊन विक्रीदार व खरेदीदार यांचेकडुन प्राप्त झालेल्या कागदपत्रांची सविस्तर चौकशी करुन जात प्रमाणपत्राच्या आधारे सदर जमिन विक्री करण्याची परवानगी देण्यात आली असल्याचे नमूद केले आहे.

मा. लोकप्रतिनिधींच्या तक्रारीच्या अनुषंगाने श्री. पवन चिंतल यांच्या जात प्रमाणपत्राची पडताळणी करण्याबाबत अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, गडचिरोली यांना सूचना देण्यात आल्या आहेत.

४) प्रश्न उद्‌भवत नाही

---

**लक्कडकोट (ता. राजुरा जि. चंद्रपूर) येथे मलेरिया वर्कर उपलब्ध करुन देणेबाबत**

**(४०) १४३४५ (१५-०९-२०२०). श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लक्कडकोट (ता. राजुरा जि. चंद्रपूर) येथे मलेरिया वर्कर तातडीने उपलब्ध करण्याबाबत बल्लारपूर येथील लोकप्रतिनिधीनी यांनी दिनांक १४ जुलै २०२० रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदन सादर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राजेश टोपे (२०-०७-२०२१) :** (१)प्राप्त अहवालानुसार सदर निवेदन मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद चंद्रपूर व जिल्हा आरोग्य अधिकारी, चंद्रपूर यांना निवेदन देण्यात आले होते.

(२) प्राप्त अहवालानुसार सहसंचालक आरोग्य सेवा (हिहजजरोग) पुणे-६ या कार्यालयाचे पत्र क्र. ससंआसे /किजरो /तां.२ /हंगामी मनुष्यबळ मागणी जिल्हा चंद्रपूर /१३९०५-०९ /२०,

दि.०७.०८.२०२० रोजीच्या पत्रान्वये जिल्हा हिवताप अधिकारी, चंद्रपूर यांना सर्व्हेक्षणासाठी हंगामी क्षेत्र कार्यकर्ता मनुष्यबळ याबाबीसाठी १७४ हंगामी मनुष्यबळ मजूरी दिवस मंजूर करून देण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**भेंडाळा (ता.चामोर्शी, जि.गडचिरोली) गावाजवळ वैनगंगा नदीवर राजीव ऊपसा सिंचन योजना कार्यान्वित करणेबाबत**

**(४१) १४५२१ (११-०९-२०२०). डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भेंडाळा (ता.चामोर्शी, जि.गडचिरोली) गावाजवळ वैनगंगा नदीवर राजीव ऊपसा सिंचन योजना प्रस्तावित असून अन्वेषणाधिन आहे व अद्‌याप प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेमुळे चामोर्शी तालुक्यातील एकूण ६१०४ हेक्टर क्षेत्रास सिंचन प्रस्तावित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर सिंचन योजना कार्यान्वित झाल्यास या क्षेत्रातील शेतकऱ्यांना त्याचा लाभ मिळणार असल्याने या योजनेला प्रशासकीय मान्यता प्रदान करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. जयंत पाटील (०७-०७-२०२१) :** (१) होय,

(२) होय

(३) राजीव उपसा सिंचन योजना ही प्रथमत: कळमगांव बॅरेजचे (प्रस्तावाधीन) पार्श्व जलातून प्रस्तावित करुन त्याचे सर्वेक्षण अन्वेषण पूर्ण करुन मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक कडून संकल्पने तयार करण्याची कार्यवाही सुरु होती. तथापि, चिचडोह बॅरेज (बांधकामाधीन) वरुन लाभान्वित होणारी लोंढोली उपसा सिंचन योजनेचे लाभक्षेत्र गोसीखुर्द प्रकल्पाअंतर्गत येत असल्याने चिचडोह बॅरेजवरुन लोंढोली उसिंयो रद्द करुन त्याऐवजी राजीव उसिंयो घेण्याबाबत मा. श्री देवराव होळी, विसस, गडचिरोली यांची मागणी असल्याने त्याप्रमाणे अभ्यास करुन राजीव उसिंयोचे स्थळ चिचडोह बॅरेजवरुन घेण्यात आले. बॅरेजमधून बदललेल्या उचल स्थळावरुन नव्याने सर्वेक्षण व अन्वेषणाची कामे पूर्ण करण्यात आली. त्याप्रमाणे माहिती क्षेत्रीय स्तरावर मध्यवर्ती संकल्पचित्र, नाशिकला सादर करण्यात येत आहे. मध्यवर्ती संकल्पचित्र, नाशिक कडून संकल्पने व रेखाचित्रे पूर्ण झाल्यावर सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यात येईल. व त्यांनतर तो राज्य तांत्रिक सल्लागार समिती, नाशिक यांना तपासणीस्तव सादर होईल. त्यानंतर प्रकल्प अहवालास महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, मुंबई यांची मान्यता घेऊन प्रशासकीय मान्यतेस्तव प्रस्ताव शासनास प्राप्त झालेनंतर पुढील कार्यवाही करणे शक्य आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### राज्यातील अनुदानीत महाविद्यालयाकडुन माहिती अधिकाराचे उल्लंघन होत असल्याबाबत

**(४२) १४५६९ (१३-०९-२०२०). श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव), श्री.राजू कारेमोरे (तुमसर), श्री.इंद्रनिल नाईक (पुसद) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनुदानीत महाविद्यालयांकडून माहिती अधिकाराचे उल्लंघन होत असल्याचे माहे एप्रिल, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील अनुदानीत माहाविद्यालयांच्या संस्थेबाबत विविध प्रकारच्या १७ मुदयांची माहिती संकेतस्थळावर देणे अनिवार्य असूनही अल्प महाविद्यालयांनी माहिती दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, व त्यानुसार सदर अनुदानीत महाविद्यालयांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. उदय सामंत (१९-७-२०२१) :** (१) हे खरे नाही

(२) अंशत: खरे आहे.

बऱ्याच महाविद्यालयांनी १७ मुद्यांची माहिती संकेतस्थळावर प्रसिध्द केलेली असून काही महाविद्यालयांची माहिती अद्ययावत करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यातील मान्यताप्राप्त शाळांना अनुदान तसेच विनावेतन शिक्षकांचे वेतनप्रकरणी नेमलेल्या समितीच्या अहवालाबाबत

**(४३) १४९१० (१९-११-२०२०). श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.अशोक पवार (शिरुर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव), श्री.संजयमामा शिंदे (करमाळा), श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण), श्री.राजेश नरसिंगराव पाटील (चंदगड), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.बबनराव दत्तात्रय यादव (लोणीकर) (परतूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) राज्यातील मान्यता प्राप्त खाजगी प्राथमिक आणि माध्यमिक शाळांना पुढील अनुदानाचा वाढीव टप्पा देण्याबाबत तसेच विनावेतन शिक्षकांच्या अनेक प्रलंबित प्रश्नांच्या प्रस्तावांवर शासनाने दिनांक २६ ऑगस्ट, २०२० रोजी वा त्यासुमारास झालेल्या मंत्रीमंडळाच्या बैठकीत निर्णय घेऊन त्याबाबतचा अहवाल सादर करण्याबाबत दिनांक १७ सप्टेंबर, २०२० रोजी वा त्या दरम्यान मा.महसूल मंत्री यांचे अध्यक्षतेखाली मंत्रीगटाची समिती स्थापन केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील शाळांना तात्काळ अनुदान वितरीत करावे तसेच गेल्या १५ वर्षापासून अनियमित वेतन मिळालेल्या विनावेतन शिक्षकांना वेतन अदा करण्यासाठी नवयुग क्रांती संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी दिनांक १६ सप्टेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास आत्मदहन करण्याचा प्रयत्न केला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अनुदाना अभावी अनेक शिक्षकांचे वेतन थकित असल्याने आर्थिक संकट निर्माण झाले असून उदरनिर्वाहासाठी कोणताही पर्याय उपलब्ध नसल्याने त्यांच्या कुटुंबियांवर उपासमारीची वेळ आली असल्याने नैराश्य आलेल्या अनेक शिक्षकांनी आत्महत्या केल्या आहेत तसेच ११ जणांचे हृदयविकाराने निधन झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या संदर्भात स्थापन करण्यात आलेल्या समितीने आपला अहवाल शासनास सादर केला आहे काय, याबाबत समितीने कोणत्या शिफारशी केल्या आहेत व त्यावर शासनाने कोणता निर्णय घेतला आहे, अद्याप अहवाल सादर केला नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत,

(५) तसेच मागील १५ वर्षापासून अनियमित वेतन व वेतन न मिळणाऱ्या शिक्षकांना वेतनवितरीत करण्यात यावे, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे ?

**प्रा. वर्षा गायकवाड (२१-९-२०२१) :** (१) होय.

(२) व (३) याबाबतचा अहवाल प्राप्त झालेला नाही.

(४) व (५) होय. मंत्रीगट समितीने सादर केलेला अहवाल मंत्रीमंडळाच्या दिनांक १४ ऑक्टोबर, २०२० च्या बैठकीत ठेवण्यात आला होता. त्यावर मंत्रिमंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार, सदर शाळांना अनुदान उपलब्ध करुन देण्याबाबत पुढील कार्यवाही सुरु आहे.

---

**राज्यातील महिलांवरील अत्याचारांमध्ये झालेली वाढ**

**(४४) १४९६५ (२७-११-२०२०). श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.बबनराव दत्तात्रय यादव (लोणीकर) (परतूर), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरोनावर उपचार घेण्यासाठी पनवेल, पुणे, इचलकरंजी, नंदुरबार, चंद्रपूर इत्यादी ठिकाणच्या विलगीकरण केंद्रात दाखल झालेल्या महिला तरुणीवर अत्याचार व विनय भंगाच्या घटना घडल्या असून राज्यातील विलगीकरण केंद्र तसेच इतरत्रही बलात्कार, विनयभंग यासारख्या महिलांवरील अत्याचारांच्या घटनांमध्ये वाढ होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशा किमान २४ घटनांचा उल्लेख करून त्यातील आरोपींवर कारवाई करण्याबरोबरच दोषी अधिकाऱ्यावरही कारवाई करण्याबाबत तसेच कोविड केंद्रासंदर्भात एस.ओ.पी तयार करण्याबाबतची मागणी विरोधी पक्षनेता विधानसभा, यांनी मा. मुख्यमंत्री महोदयांकडे दिनांक १६ सप्टेंबर, २०२० रोजी वा त्या सुमारास पत्राद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त पत्राच्या अनुषंगाने दोषी आरोपी व संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करून कोविड केंद्रासंदर्भात एस.ओ.पी तयार करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (०९-०८-२०२१)** : (१) नाही. पनवेल (नवी मुंबई), इचलकरंजी (कोल्हापूर), नंदुरबार, चंद्रपूर व गडचिरोली येथील विलगीकरण केंद्र / कॅारन्टाईन सेंटर या ठिकाणी लैंगिक अत्याचाराच्या घटना घडलेल्या आहेत.

(२) अंशत: हे खरे आहे.

(३) उक्त ठिकाणी घडलेल्या घटनेंबाबत दोषींविरूध्द खालील ठिकाणच्या पोलीस स्टेशन मध्ये गुन्हे नोंदविण्यात आले आहेत.

| अ.क्र. | पोलीस ठाणे | गु.र.क्र. / कलम |
|---|---|---|
| १) | नंदूरबार शहर | गु.र.क्र. ५४५/२०२०, भा.दं.वि. कलम ३५४ (अ) |
| २) | एटापल्ली, जि. गडचिरोली | गु.र.क्र. ३४/२०२०, कलम ३५४, ४४८, १८८, ३४ , भा.दं.वि. |
| ३) | ब्रम्हपूरी, जि. चंद्रपूर | गु.र.क्र. २४८/२०२०, कलम ३५४, २९४, ३२३, ५०६ भा.दं.वि.सह कलम ३(१) (डब्ल्यु) (आय) अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा |
| ४) | इचलकरंजी, जि. कोल्हापूर | गु.र.क्र. ३०८/२०२०, भा.दं.वि. सह कलम ३५४ (क) |
| ५) | राजारामपूरी, जि. कोल्हापूर | गु.र.क्र. २८६/२०२०, भा.दं.वि. सह कलम ३५४(ब), सह पोस्को २०१२ चे कलम ११, १२ |
| ६) | ता. पनवेल, नवी मुंबई | गु.र.क्र. १०१/२०२०, भा.दं.वि. कलम ३७६, ३५४ |
| ७) | कोमोठे, नवी मुंबई | गु.र.क्र. ४६०/२०२०, भा.दं.वि. कलम ३५४ |

कोवीड सेंटर / कॅारन्टाईन सेंटरमध्ये महिला व बालकांविरूध्द होणा-या घटना रोखण्याकरीता करावयाच्या उपाययोजनाबाबत सूचना सर्व घटकांना दिलेल्या आहेत. परिपत्रकातील महत्वाच्या सूचन खालीलप्रमाणे आहेत :-

- कॅारन्टाईन सेंटर परिसरात गस्तीकरीता स्वतंत्र पथके नेमूण सदर पथकांनी प्रभावीपणे गस्त करणे आवश्यक आहे, जेणेकरून सेंटर परिसरात काही संशयास्पद हालचाली किंवा इसम आढळुन आल्यास आवश्यक कारवाई करण्यात येते.
- कोवीड केअर सेंटर मध्ये पोलीस नियंत्रण कक्ष, स्थानिक पोलीस ठाणे, महिला हेल्पलाईन क्रमांकाची यादी लावण्यात येते व त्याठिकाणी दाखल महिला व बालकांना याबाबत माहिती देण्यात येते.
- कॅारन्टाईन सेंटरच्या बाहेर योग्य पोलीस बंदोबस्त नेमण्यात येत आहे.
- सेंटरचे प्रशासकिय अधिकारी व पोलीस यांच्यात समन्वय ठेवण्यात येत आहे.
- कोवीड सेंटर / कॅारन्टाईन सेंटरमध्ये काम करणारे वॅार्ड बॅाय, सुरक्षा रक्षक व इतर कर्मचारी यांची चारित्र्य पडताळणी करून घेण्याबाबतच्या सूचना दि. ०५.११.२०२० रोजीच्या परिपत्रकान्वये सर्व पोलीस घटकांना देण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

### चिपळूण (जि.रत्नागिरी) येथील वशिष्ठी नदी शुध्दीकरणाच्या घोषणेबाबत

**(४५) १५४८६ (२६-११-२०२०). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय -

(१) चिपळूण (जि.रत्नागिरी) येथील वशिष्ठी नदीचे शुध्दीकरण करण्यात येणार असल्याची घोषणा मा. पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री यांनी माहे जानेवारी-फेब्रुवारी- २०१९ यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कामासाठी किती निधी मंजूर करण्यात आला आहे आणि या कामाचे स्वरुप व सदय:स्थिती काय आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. आदित्य ठाकरे (३०-०७-२०२१) :** (१) व (२) वशिष्ठी नदीवरील कोतवाली नाल्यावर सांडपाणी प्रक्रीया करण्यासाठी नाल्याअंतर्गत फायटोरिमेडिएशन तंत्रज्ञान वापरून सांडपाणी प्रक्रीया प्रकल्प राबविण्याचे ठरविले आहे. दिनांक ०४.०३.२०१९ रोजी तत्कालीन पर्यावरण मंत्री यांच्या हस्ते फायटोरिमेडिएशन चे भुमिपूजन करण्यात आले होते. यासाठी १ कोटी ५३ लक्ष ४० हजार रूपयांची तरतूद करण्यात आली असून माहे मार्च, २०१९ मध्ये महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाव्दारे कार्यादेश निर्गमित करण्यात आला आहे.

मे.टेक्नोग्रीन इन्व्हायरमेंटल सोलुशन्स, पुणे यांना सदरिल फायटोरिमेडिएशन प्रकल्पाचे प्रायोगिक तत्त्वावर काम देण्यात आलेले असून पुढील काम प्रगतीपथावर आहे.

(३) प्रश्न उदभवत नाही.

---

### मुंबई महानगरपालिकेने मंजूर केलेल्या आराखड्याच्या सिमांकनात सुधारणा करण्याबाबत

**(४६) १६०४० (२५-११-२०२०). डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेने सन २०१८ मध्ये मंजूर केलेल्या आराखड्यात ५२ गावठाणे आणि २६ कोळीवाड्यांचे केलेल्या सिमांकनात सुधारणा करुन दिनांक २ ऑक्टोबर, २०२० रोजी वा त्या सुमारास सुधारित केलेल्या १३ कोळीवाड्यांचे सुधारित सीमाकंन जाहीर करुन त्याचा मसुदा जाहिर करण्यात आल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, १३ कोळीवाड्यांच्या केलेल्या अंतिम सुधारित सीमांकनात फसवणूक झाल्याची बाब निदर्शनास आलेली असून सदर कोळीवाड्यांच्या सीमा अंतिम करताना सहायक आयुक्त, मत्स्यव्यवसाय, मुंबई शहर व मुंबई उपनगर कार्यालयातील परवाना अधिकारी यांनी स्थानिक मच्छीमारांना नकाशे दाखवून त्यांच्या स्वाक्षरी घेतलेल्या नसून त्यातील विस्तारीत सीमा दाखविल्या नसल्याचे आक्षेप मूळ कोळी बांधवांनी घेतल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोळीवाड्यातील मूळ भूमिपूत्रांच्या सार्वजिनिक वापरायच्या जमिनी खाजगी क्षेत्र, मासेमारीचे क्षेत्र, मंदीर, चर्च, दर्गा, मैदाने, गार्डन, बाजारपेठ, स्मशानभूमी, मोकळ्या जागा, मासळी सुकविण्याच्या जागा इत्यादी संदर्भातील जागा सुधारित नकाशात निर्देशित केलेल्या नसल्याचेही निदर्शनास आलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने मागविलेल्या आक्षेपांबाबत वेसावा कोळी जमात वेसावा तसेच महाराष्ट्र मच्छीमार कृती समिती यांनी दिनांक २० ऑक्टोबर, २०२० रोजी वा त्या सुमारास आयुक्त, मुंबई महानगरपालिका यांना निवेदन दिलेले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने सदर अंतिम सिमांकनात दुरुस्ती करुन सुधारित मुंबई विकास आराखडा ३०३४ निर्देशित करण्याबात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात (१२-८-२०२१) :** (१), (२), (३), (४) व (५) मस्त्यव्यवसाय विभागाच्या माहिती नुसार मुंबई शहर जिल्ह्यात १२ तर मुंबई उपनगर जिल्ह्यात २९ असे एकूण ४१ कोळीवाडे आहेत. सदर कोळीवाड्यांच्या सिमांकनाबाबतची कार्यपध्दती व मार्गदर्शक तत्वे निश्चित करण्यासाठी दिनांक २०.११.२०१२ च्या शासन निर्णयान्वये एक समिती गठित करण्यात आली होती.
त्यानुषंगाने, उपसंचालक, भूमि अभिलेख, कोंकण प्रदेश, मुंबई यांनी दिनांक ०१.०१.२०१८ च्या पत्रान्वये प्रत्यक्ष कोळीवाड्यांचा स्थळ पाहणी करून शासनास सादर केलेला अहवाल स्विकारण्यास शासनाने मान्यता दिली. सदर मान्यतेनुसार मुंबईतील कोळीवाड्यांचे प्रत्यक्ष सर्वेक्षण करुन सिमांकन करण्याचे शासनाने निश्चित केले आहे.
उपसंचालक, भूमि अभिलेख, कोंकण प्रदेश, मुंबई यांनी दिनांक २४.१२.२०१८ व १२.०२.२०१९ च्या पत्रान्वये मुंबई उपनगरामधील १४ कोळीवाड्यांचे सर्वेक्षण व सिमांकनाबाबतची कार्यवाही करून शासनास अहवाल सादर केला. महसूल विभागाने यापैकी मुंबई उपनगरातील १२ कोळीवाड्यांचे सिमांकन गावठाणाच्या हद्दीमध्ये करण्याच्या शिफारशीसह सदर कोळीवाड्यांचे सर्वेक्षण व सिमांकनाबाबतचा अहवाल व नकाशे नगर विकास विभागास विकास आराखड्यात समावेश करण्याबाबत उपलब्ध करून देण्यात आले. त्यानुषंगाने नगर विकास विभागाने सदर कोळीवाड्यांचे सर्वेक्षण व सिमांकनाबाबतचा अहवाल व नकाशे बृहन्मुंबई महानगरपालिकेस अग्रेषित केले असता, संबंधित कोळीवाड्यांच्या सिमांकनाचे नकाशे बृहन्मुंबई महानगरपालिकेने विकास नियोजन आराखडा-२०३४ च्या जी.आय.एस. प्रणालीवर प्रतिबिंबित करण्याची कार्यवाही करून, त्यावर जनतेकडून सूचना/हरकती १ महिन्यात सादर करण्यासाठी दिनांक ०२.१०.२०२० च्या वृत्तपत्रात जाहिरात देण्यात आली होती. त्यानुषंगाने शासनास तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेस सूचना/हरकती प्राप्त होत आहेत. प्राप्त झालेल्या सूचना/हरकती यांच्या अभ्यास करण्यात येवून पुढील कार्यवाही करण्याचे नियोजीत आहे.
त्यानंतर मा. मंत्री (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २१.०२.२०१९ रोजी झालेल्या बैठकीमध्ये उर्वरित कोळीवाड्यांचे सिमांकन करण्याबाबत सूचना देण्यात आल्या. त्यानुसार उपसंचालक, भूमि अभिलेख, कोंकण प्रदेश, मुंबई यांनी दिनांक ११.१२.२०१९ रोजी ९ कोळीवाड्यांचे सर्वेक्षण व सिमांकनाबाबतची कार्यवाही करून शासनास अहवाल सादर केला होता. सदर कोळीवाड्यांच्या सिमांकनाचे नकाशे महसूल विभागाने दिनांक २१.०८.२०२० रोजी नगर विकास विभागास सादर केले असून, सध्य:स्थितीत बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून सदर नकाशे विकास नियोजन आराखडा-२०३४ च्या जी.आय.एस. प्रणालीवर प्रतिबिंबित करण्याची कार्यवाही सुरू आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

## पुणे येथील झील एज्युकेशन सोसायटीने शासनाची आणि विद्यार्थ्यांची आर्थिक फसवणूक केल्याबाबत

**(४७) १६९५१ (२५-११-२०२०). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील झील एज्युकेशन सोसायटी अंतर्गत येणाऱ्या झील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग आणि रिसर्च, नऱ्हे, झील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट आणि कॉम्प्यूटर ॲप्लिकेशन, नऱ्हे, झील इन्स्टिट्यूट ऑफ बिझनेस ॲडमिनीस्ट्रेशन संगणक ॲप्लिकेशन आणि रिसर्च सेंटर, नऱ्हे, झील पॉलिटेक्निक, नऱ्हे, पुणे यांनी शासनाची आणि विद्यार्थ्यांची कोट्यवधी रुपयांची आर्थिक फसवणूक केल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, झील एज्युकेशन सोसायटीचे संचालक मंडळ तसेच झील एज्युकेशन सोसायटी या संस्थेत काम करणारे प्राचार्य, अकाऊंट व इतर स्टाफ यांनी संगनमताने शासनाची व विद्यार्थ्यांची कोट्यवधी रुपयांची फसवणूक केल्याचे निष्पन्न झाले असून सदर गैरव्यवहाराची व्याप्ती मोठी असल्याने या प्रकरणाचा तपास आर्थिक गुन्हे शाखा, पुणे यांचेकडे वर्ग करण्यासाठी वरिष्ठ पोलीस निरीक्षक, सिंहगड रोड, पो.ठाणे, पुणे शहर यांनी पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-३, पुणे शहर यांना जा.क्र.५४२३/२०२०, दि.०३ सप्टेंबर,२०२० रोजी कळविले असल्याचे ही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय ,

(३) असल्यास, संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांना दि.०६ फेब्रुवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास केलेल्या पत्रव्यवहारात झील एज्युकेशन सोसायटी संचालित संस्थेने नियमबाह्य कारभार, प्रशासकीय व वित्तीय अनियमितता, खोटी बनावट माहितीच्या आधारे शुल्क आकारणी ई. बाबत शुल्क नियामक प्राधिकरण, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांचेस्तरावरून कळविले असल्याचे ही निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. उदय सामंत (१६-०९-२०२१) :** (१) होय, अंशत: खरे आहे,

सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय, पुणे यांचेकडे सन २०१८ मध्ये प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने त्यांचे स्तरावरुन केलेल्या चौकशीत झील पॉलिटेक्नीक, नऱ्हे, पुणे या संस्थेने सन २०१५-१६ मध्ये वेतनावर जादा खर्च दाखवून शुल्क वाढवून घेतल्याच्या तक्रारीत तथ्य आढळून आल्याचे प्रथम दर्शनी दिसून आले आहे.

(२) होय,

(३) होय,

(४) झील एज्युकेशन सोसायटी अंतर्गत येणाऱ्या झील कॉलेज ऑफ इंजिनिअरींग आणि रिसर्च, नऱ्हे, झील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट आणि कॉम्प्युटर ॲप्लिकेशन, नऱ्हे, झील इन्स्टिट्यूट

ऑफ बिझनेस ॲडमिनीस्ट्रेशन संगणक ॲप्लिकेशन आणि रिसर्च सेंटर, नऱ्हे व झील पॉलिटेक्नीक, नऱ्हे, पुणे या संस्थांमध्ये सन २०१५-१६ मध्ये वेतनावर जादा खर्च दाखवून शुल्क वाढवून घेणे, नियमानुसार वेतन व भत्ते न देणे, खोटी व बनावट माहिती सादर करून मान्यता (संलग्नता) मिळवणे, खोटी माहिती सादर करून शुल्क मंजूर करून घेणे, नियमबाह्य कारभार, प्रशासकीय व वित्तीय अनियमितता, खोटी व बनावट माहिती सादर करुन शुल्कास मान्यता मिळविणे इ. बाबींवरील कार्यवाही शुल्क नियामक प्राधिकरण, मुंबई, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांचे प्राधिकारात येते.

यास्तव सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय, पुणे यांचे स्तरावरुन करण्यात आलेल्या चौकशी अहवालातील निष्कर्षावर कार्यवाही करण्यासाठी शुल्क नियामक प्राधिकरण, मुंबई, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांना चौकशी अहवाल पाठविण्यात आला आहे.

(५) लागू नाही.

---

## सेलू (जि.परभणी) येथील पोलीस कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानांची झालेली दुरवस्था

**(४८) १७८६९ (२३-११-२०२०). श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर):** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सेलू (जि.परभणी) येथील पोलीस कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानांची दुरवस्था झाली असल्याने पोलीस कर्मचारी व कुटुंबीयांची गैरसोय होत असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या पोलीस कर्मचारी वसाहतीसाठी जागा उपलब्ध असतानाही सन २०१८ पासून सुधारित परिपत्रकानुसार प्रस्ताव गृह मंडळ विभाग स्तरावर प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रस्तावास मंजुरी देण्यासह पोलीस वसाहतीच्या बांधकामासाठी तातडीने निधी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (२८-०७-२०२१) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) पोलीस ठाणे, सेलू येथे पोलीस अधिकारी/ कर्मचारी यांचेकरिता एकूण ८६ सेवा निवासस्थाने बांधण्याबाबतचा प्रस्ताव महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळाकडे कार्यवाहीधीन आहे. उक्त प्रकल्पास प्राधान्यक्रम व निधी उपलब्ध झाल्यानंतर पुढील आवश्यक कार्यवाही करण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उदभवत नाही.

---

## विरार (ता.वसई जि. पालघर) येथील जिल्हा अपंग पुनर्वसन केंद्र मागील दोन वर्षांपासून निधीअभावी बंद असल्याबाबत

**(४९) १८६५९ (१९-११-२०२०). श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विरार (ता.वसई, जि.पालघर) येथील मागील २ वर्षापासून बंद असलेल्या जिल्हा अपंग पुनर्वसन केंद्रात निधीची कमतरता होत असल्यामुळे हजारो अपंग बांधवांना विविध योजनांच्या थेट लाभांपासून वंचित रहावे लागत असून,निधीअभावी दैनंदिन खर्च करणे हे देखील या अपंग पुनर्वसन केंद्राला अशक्य झाल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विरार येथील जिल्हा अपंग पुनर्वसन केंद्रासाठी आवश्यक तेवढ्या निधीची नियमितपणे तरतूद करून दिव्यांगांना विविध योजनेचा लाभ मिळवून देण्याची मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (१७-९-२०२१) :** (१) हे खरे नाही.

२), ३) व ४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चारगांव -शिरपुर-शिंदोला- ढाकोरी - वेळाबाई (ता. वणी, जि. यवतमाळ) या रस्त्याची झालेली दुरवस्था

**(५०) १९१७७ (२१-११-२०२०). श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चारगांव-शिरपुर-शिंदोला-ढाकोरी-वेळाबाई (ता.वणी, जि.यवतमाळ) या रस्त्यांची खड्ड्यांमुळे दुरवस्था झाली असल्याने येथील अपघातामंध्ये वाढ होत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर खंड्ड्याची दुरुस्ती करुन रस्त्याचे मजबुतीकरण आणि डांबरीकरण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण (२६-०८-२०२१) :** (१) चारगांव-शिरपुर-शिंदोला-कळमना (रा.मा.३१७) हा एक रस्ता असून, त्याला जोडणारा ढाकोरी-वेळाबाई (रा.मा.३७४) हा रस्ता आहे. सदर दोन्ही रस्त्यांवर काही प्रमाणात खड्डे पडले असल्याची बाब अंशत:खरी आहे. परंतू रस्त्याच्या दुरवस्थेमुळे अपघाताचे प्रमाण वाढले ही बाब खरी नाही.

(२) सदर दोन्ही रस्त्यांवर खडी व मुरूमाद्वारे (WBM) दुरुस्तीचे काम सद्यस्थितीत प्रगतीत आहे. चारगांव-शिरपुर-शिंदोला-कळमना या रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरणाचे काम केंद्रिय मार्ग निधी अंतर्गत मंजूर असून निविदेविषयक कार्यवाही प्रगतीत आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.